CMYK

आयपीएल सामना क्र.३२

Royal Challengers Vs Rajasthan Royals

रॉयल चॅलेंजर्स बँगलोर वि.राजस्थान रॉयल्स

वेळ : सायं.३.३० वा.

स्थळ : चिन्नास्वामी स्टेडियम, बेंगलुरु

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

आयपीएल सामना क्र.३३

Chennai Super Kings Vs Kolkata Knight Riders

चेन्नई सुपरकिंग्ज वि.कोलकाता नाईट रायडर्स

वेळ : सायं.७.३० वा.

स्थळ : ईडन गार्डन, कोलकाता

www.surajyadigital.com | रविवार, दि.२३ एप्रिल २०२३ | वर्ष : २१ वे अंक : २०४ वा किंमत : ५ रुपये पाने ८

# अक्षय्यतृतीयेला कोट्यवधींची उलाढाल

## सोने ६ कोटी, जागा खरेदी १० कोटी, घर बुकिंग १५ कोटी, मोबाईल १२ कोटी

सुराज्य/सोलापूर

**साडेतीन मुहूर्तापैकी एक असणाऱ्या अक्षय्यतृतीयेनिमित्त सोलापूरच्या बाजारपेठेत शनिवारी कोट्यवधींची उलाढाल झाली. सराफ बाजार, वाहन खरेदी, इलेक्ट्रॉनिक्सची दुकाने ग्राहकांच्या गर्दीने बहरली होती. विशेष म्हणजे अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सोने खरेदीला महत्त्व असल्यामुळे सुवर्ण अलंकार खरेदीसाठी महिलांची तोबा गर्दी झाली होती. शहर परिसरात मोठ्या बांधकाम व्यावसायिकांच्या योजना आल्याने जागा आणि घरामध्ये गुंतवणूक करण्याकडे यंदा कल दिसून आला. एका दिवसात तब्बल ५० कोटींची उलाढाल झाल्याची माहिती आहे.**



अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर सोने खरेदीला अधिक महत्त्व दिले जाते. त्यामुळे अन्य बाजारपेठेपेक्षा सराफ बाजारात ग्राहकांची अधिक गर्दी दिसून आली. अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्तावर खरेदी केलेल्या सोन्याची वृध्दी होते, असे मानले जात असल्याने सर्व बाजारात खरेदीसाठी मोठी गर्दी होती. सोलापूरचे तापमान ४० च्या आसपास असताना देखील उन्हाचा तडाखा कमी झाल्यानंतर ग्राहक खरेदीसाठी बाहेर पडल्याने सराफ बाजारात गर्दी दिसून आली. अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्त साधून हजारो नव्या गाड्या रस्त्यावर धावल्या. सोलापुरातील चव्हाण, राहुल ह्युंदाई, चव्हाण ॲटोमोबाईल्स, आहेरकर बजाज, कायझन होंडा, लक्ष्मी टोमोबाईल्स, सिद्दी सुझुकी, गांधी टीव्हीएस, टोयाटो अशा विविध कंपन्यांच्या वाहन विक्रेत्यांकडून वाहनांची विक्री मोठ्या प्रमाणात झाली. याबरोबर मोठ्या गाड्यांची विक्री झाली. ग्राहकांनी अगोदरच आपल्या वाहनांची नोंदणी केली असल्याने गोंधळ उडाल्याचे दिसून आले नाही. सराफ बाजार, वाहन व्यवसाय, इलेक्ट्रॉनिक्सची दुकाने गर्दीने बहरली असल्याचे दिसून आले.

| | | |
|---|---|---|
| सोने | : | ५ ते ६ कोटी |
| जागा खरेदी | : | १० कोटी |
| तयार सदनिका बुकिंग | : | १५ कोटी |
| मोबाईल | : | १२ कोटी |
| इलेक्ट्रॉनिक्स | : | १२ कोटी |



इलेक्ट्रॉनिक्सची दुकाने ग्राहकांच्या गर्दीने बहरली होती. यंदा उन्हाळा तीव्र असल्याने एसी, फ्रिज, कुलर खरेदी करण्याकडे ग्राहकांचा कल दिसून आला. टीव्हीसाठी सुमार प्रतिसाद मिळाला. मात्र यंदा या क्षेत्रात १० ते १२ कोटीची उलाढल झाल्याने व्यापारी वर्गामध्ये समाधान असल्याचे सोलापूर इलेक्ट्रीक असोशिएशनचे संस्थापक केतन शहा यांनी सांगितले

मोबाईल मार्केटमध्ये देखील चांगली उलाढल झाली. क्रोमा, रिलायन्स, जीओ कंपनीच्या थेट विक्रीच्या दालनाकडे तरूणांचा खरेदीचा कल दिसून आला. यंदा सॅमसंगचे ए ३४, ५४, ॲपलचे पल्स ४, विवो वाय ५६, वन पल्स साखरे ५ जी मोबाईल बाजारात आल्याने या मोबाईल खरेदीकडे ग्राहकांचा कल दिसून आला. रेडमी, एमआय या चिनी मोबाईलला उठाव दिसला नाही. यंदा मोबाईल बाजारात १२ कोटींची उलाढाल झाल्याचे व्यापारी महेश चिंचोळी यांनी सांगितले

शुध्द सोने खरेदी करण्याकडे ग्राहकांचा कल दिसून आला. सोन्याची अंगठी खरेदी करण्याबरोबरच सोन्याची बिस्किटे, नाण्यांच्या खरेदीलाही ग्राहकांनी प्रथम पसंती दिली. ६० हजार ८०० रुपये असा एक तोळा सोन्याचा (१० ग्रॅम सोने) तर चांदी ७५ हजार ५०० रूपये प्रतिकिलो दर होता. दर वाढलेले असतानाही ग्राहकांनी अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सोने खरेदी मोठ्या प्रमाणात केल्याचे दिसून आले. महिलांची विशेष गर्दी झाली होती. यंदा सराफ बाजारात ५ ते ६ कोटीची उलाढाल झाल्याचे सराफ व्यापारी गिरीष देवरमनी यांनी सांगितले.

प्लॉट आणि फ्लॅट खरेदीमध्ये गुंतवणूक फायदेशीर असल्याने तसेच चांगल्या नामवंत बिल्डर यांचे चांगले प्रोजेक्ट सादर झाल्याने तयार घर बुकिंग करण्याकडे आणि ओपन जागा खरेदीसाठी ग्राहकांचा अधिक कल दिसून आला. ओपन जागांमध्ये १० ते १२ कोटी तर तयार घर बुकिंगमध्ये १३ कोटी असे २५ कोटीच्या आसपास उलाढाल झाली असल्याची माहिती बिल्डर असोसिएशनचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष दत्ता मुळे यांनी सांगितले.

# मिरवणुकीने वाढवला बसवजयंतीचा उत्साह

## लेझीम, पारंपारिक वाद्ये, डॉल्बीचा दणदणाट

सुराज्य/सोलापूर



मिरवणुकीत कट्टपाची वेशभूषा दाखल केलेल्या व्यक्तीने सर्वांचे लक्ष वेधले.

महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीत लेझीम, पारंपारिक वाद्ये, डॉल्बीचा दणदणाट, लेजर शो आणि खास कर्नाटकातील कलावंतांनी सादर केलेल्या वीरभद्र नृत्याविष्काराने बसवभक्तांमध्ये उत्साह होता. मिरवणुकीत आ. विजयकुमार देशमुखांनी हजेरी लावली होती.


प्रारंभी बाळीवेस येथील मल्लिकार्जुन मंदिरासमोर सायंकाळी पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांच्या हस्ते व आ. प्रणिती शिंदे, सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, माजी आमदार दिलीप माने यांच्या प्रमुख उपस्थितीत मूर्तीचे पूजन करण्यात आले. यावेळी मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष चिदानंद वनारोटे, प्रकाश वाले, गणेश वानकर, केदार उंबरजे, सुदीप चाकोते, कुमार करजगी, सुधीर थोबडे, महेश थोबडे, तम्मा मसरे, रेवणसिध्द आवजे, ॲड.नीलेश ठोकडे, नरेंद्र गंभीरे, आनंद मुस्तारे, सचिन शिवशक्ती, अनिल परमशेट्टी, ॲड. मल्लिनाथ राचेटी, संतोष केंगनाळकर, गणेश चिंचोळी, बसवराज सावळगी, वेदमूर्ती बसवराज शास्त्री हिरेमठ, शिवयोगी शास्त्री होळीमठ, सिध्दय्या स्वामी, विजयकुमार बिराजदार, शिवानंद सावळगी, राजशेखर बुरकुले, नागेश बडदाळे, गुरुशांत मोकाशी, मल्लिनाथ सोलापुरे, वैभव विभूते, नागेश शिवशक्ती, विजयकुमार हेले आदी उपस्थित होते. महाकाल प्रतिष्ठानने साकारलेली श्री शंकराची मुर्ती आणि महात्मा बसवेश्वरांचा अश्वारुढ पुतळा सर्वांचे आकर्षण ठरले. पाणीवेस तालीम स्वराज्य प्रतिष्ठानच्या गणवेशधारी कार्यकर्त्यांनी लेझीमचा बहारदार खेळ सादर केला. या मिरवणुकीत कट्टपाच्या वेशभूषा दाखल केल्याल्या व्यक्तीने सर्वांचे लक्ष वेधले.

# जाधववाडी येथे दारुच्या कारखान्यात स्फोट

**सोलापूर** : जाधववाडी (मोडनिंब, ता. माढा) येथे शोभेची दारु बनवणाऱ्या कारखान्यात शनिवारी दुपारी स्फोट झाला. या दुर्घटनेत एकजण जखमी झाला आहे. त्याला सोलापूरमधील रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

दरम्यान या घटनेची चौकशी सुरू झाली असून याप्रकरणी जखमी दत्तात्रय विष्णू बिनगे याच्या विरुद्ध टेंभुर्णी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. शनिवार, २२ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजेच्या दरम्यान हा स्फोट झाला असून याप्रकरणी गणेश जगताप या पोलीस कर्मचाऱ्याने फिर्याद दिली आहे. जाधववाडी येथे मधूकर रामचंद्र बिनगे यांच्या शेतामध्ये पत्र्याच्या १० बाय १२ फूट आकाराच्या शेडमध्ये फटाका कारखाना सुरू होता. यावेळी स्फोट झाला जखमी दत्तात्रय बिणगे यास उपचारासाठी सोलापूरला हवण्यात आले.

# व्हायरल झालेले पत्र बनावट : धर्माधिकारी



**मुंबई** : महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्याच्या कार्यक्रमात १० हून अधिक श्री सदस्यांचा उष्माघाताने मृत्यू झाला. श्री सदस्यांच्या झालेल्या मृत्यूमुळे राज्यातील राजकारण तापले आहे अशातच शनिवारी आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या नावाने एक पत्र समाज माध्यमांवर प्रसारित झाले आहे. मात्र हे पत्र बनावड असल्याची माहिती समोर येत आहे.

आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या नावाने एक पत्र शनिवारी समाज माध्यमांवर प्रसारित झाले आहे. मात्र हे पत्र बनावट असल्याचे नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या प्रवक्त्यांनी स्पष्ट केले आहे. या बनावट पत्रात राज्य सरकारच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केले गेले होते. शासनाने दिलेला पुरस्कार परत करणार असल्याचेही नमूद करण्यात आले होते. झालेल्या घटनेची पूर्ण जबाबदारी घेऊन मी श्री सेवकांची माफी मागतो. माझ्या सर्व श्री सेवकांना मी आवाहन करतो की यापुढे भाजप आणि शिंदे गटाला मतदान करू नका, असे बनावट पत्रात नमूद करण्यात आले होते.

# मी कारखानदार पण पवारांसारखा नाही : तानाजी सावंत




**ठाणे** : २००८ ला मी पहिला साखर कारखाना माझ्या मतदारसंघामध्ये काढला. २०१७ पर्यंत माझे आठ साखर कारखाने मी स्वतः उभे केले, अजित दादासांरखे कुठलेही सहकारातले विकत घेतले नाही, असे सांगत साखर कारख्यान्याच्या मुद्द्यालवरून अजित पवार यांच्यावर आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी टिका केली.

ठाण्यात शनिवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत ठाणे सामान्य रुग्णालयाच्या पुनर्विकासाच्या भूमिपूजनाचा सोहळा आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. मी आठ ते नऊ वर्षात आठ साखर कारखाने उभे केले, अजित पवार यांच्यासारखे सहकारातून विकत घेतले नाही, असा टोला लगावला. यावेळी त्यांनी त्यांच्याबाबत करण्यात येणाऱ्या वक्तव्यांवर टीका करत त्यांच्या शिक्षणाबाबत आणि कार्यकाळाबाबत माहिती दिली.

# आमदार चोरीला जातात, जास्त जागा जिंकाव्या लागणार

### मल्लिकार्जुन खर्गेंचा असाही टोमणा



**बेळगाव** : आमच्यासाठी करा किंवा मराची स्थिती नाही, आम्ही यावेळी चांगली कामगिरी करू, कारण कधी कधी आमचे आमदार चोरीला जातात, यामुळे अधिक जागा जिंकणे गरजेचे आहे. भाजप नेहमी दबाव निर्माण करून हे काम करत असतं. कर्नाटक, महाराष्ट्र, मणिपूर, गोवा, मध्य प्रदेशात त्यांनी हेच केले आहे. त्यामुळे आमदार चोरी होऊ नये, यासाठीच अधिक आमदार निवडून आणावे लागतील, असे खर्गे यांनी म्हटले आहे. तुम्ही कर्नाटकचे मुख्यमंत्री होणार का? या प्रश्नावर म्हणाले, मी कर्नाटकमध्ये उमेदवार नाही, माझे नाव अनेकजण घेतात, पण मला राज्याच्या राजकारणात जायचे नाही.

# तापमानात घट झाल्याने सोलापूरकरांनी सोडला सुस्कारा

**सोलापूर** : सोलापूर शहराचा पारा एकदम खाली उतरल्याने शनिवारी सोलापूरकरांनी सुस्कारा सोडला. गेल्या आठवड्यात म्हणजेच बुधवारी आणि गुरूवारी असे दोन तापमान ४२ अंशाच्या पुढे गेले होते. त्यामुळे सोलापूरकरांची होरपळ झाली. अक्षय्यतृतीयेनंतर सूर्य अजून प्रखर होत जातो, असे म्हणतात. अर्थात वैशाख वणवाच. पण हा दिवस सुदैवी ठरला.

शहराचे तापमान ३८.८अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले होते. ऊन जाणवले पण होरपळ झाली नाही. सायंकाळी सूर्यास्तानंतर हवेत गरम वाफाही नव्हत्या. अधूनमधून वाऱ्याची झुळूक यायची. या वातावरणामुळे दिवसभर बाजारपेठेत खरेदी-विक्रीला उत्स्फूर्त प्रतिसाद होता. सायंकाळी विविध मंदिरांमध्ये दर्शनासाठी भाविकांमध्ये उत्साह देखील होता.गेल्या दोन दिवसात पुण्यासह सातारा याठिकाणी गारांचा पाऊस पडल्यामुळे सोलापूरच्या तापमानात घट झाल्याचे सांगण्यात येते.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




हमने जीना सिख लिया

कल्याण

389-04-257

## • महावितरणचा महापालिकेवर पलटवार

# अंतर्गत बिघाडीसाठी आम्हाला जबाबदार धरु नका

सुराज्य/सोलापूर

मागील महिनाभरापासून सोलापूर मनपाच्या हद्दीत पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. काही ठिकाणी कधी काळे पिवळे पाणी येत आहे. याबाबत मनपा वीजपुरवठ्यातील व्यत्ययाचे कारण पुढे करुन महावितरणवर खापर फोडून हात वर करत आहे. मात्र महावितरणने या सर्व आरोपाचे खंडण करत महापालिकेवर पलटवार केला आहे. अंतर्गत बिघाडासाठी आम्हाला जबाबदार धरु नका, असे महावितरणने महापालिकेला सुनावले आहे.



सोलापूर शहराला उजनी धरणातून पाणीपुरवठा होतो. त्यासाठी उजनीधरणासह आठ ठिकाणी उच्चदाब वीज जोडण्या आहेत. गेल्या काही दिवसात विजेच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस येत आहे. शेतकऱ्यांना जसा या अवकाळीचा फटका बसतो. तसाच तो वीज यंत्रणेलाही बसतो. ८ व ९ एप्रिलाही असाच तडाखा बसला. उजनी पाणीपुरवठा (भीमानगर) योजनेला वीजपुरवठा करणाऱ्या ३३ केव्ही वीज वाहिनीवर वीज पडली. विजेच्या कडकडाटाने वीज खांबावरील इन्सुलेटर (चिमणी) फुटले. अशा आपत्कालिन परिस्थितीतही महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी अख्खी रात्र जागून काढली. खराब झालेले इन्सुलेटर बदलून वीज वाहिनी सुरु केली. या ठिकाणी मनपाकडे पर्यायी वीजपुरवठ्याची व्यवस्था नाही. ती असती तर पर्यायी मार्गाने वीजपुरवठा सुरु करुन झालेला बिघाड दुरुस्त करणे शक्य झाले असते, असे महावितरणने म्हटले आहे. १६ एप्रिल रोजी पाकणी पाणीपुरवठा योजनेच्या ३३ केव्ही वाहिनींचे इन्सुलेटर विजेच्या कडकडांमुळे फुटले. यावेळी १ तास १० मिनिटे वीजपुरवठा बंद होता. ८, ९ व १६ तारखेला वीजपुरवठा खंडित झाला. मात्र त्यामागील कारण नैसर्गिक आपत्ती आहे. त्यासाठी महावितरण किंवा यंत्रणा थेट जबाबदार नाही. हे मोठे बिघाड वगळता इतर वेळी ५ मिनिटांपेक्षा कमी कालावधीच्या ट्रिपींग आल्या आहेत, असे महावितरणने स्पष्ट केले आहे.

### आमच्या नावाने खापर फोडू नका

७ फेब्रुवारीला मनपाने भवानी पेठ पंप हाऊस फिडरवर अंतर्गत देखभाल दुरुस्तीसाठी १ तास ३६ मिनिटे वीजपुरवठा बंद करुन घेतला. मात्र मनपाने ही दुरुस्तीही महावितरणच्या माथी मारलेली आहे. तसेच २० एप्रिलला महावितरणच्या बाजूने कोणताही फॉल्ट नसताना पाकणी पाणीपुरवठा योजनेच्या मनपाच्या उपकेंद्रात बिघाड झाला. या बिघाडाची संपूर्ण जबाबदारी मनपाची येते. या ठिकाणीही मनपाने माध्यमांना माहिती देताना महावितरणच्याच नावाने खापर फोडले. असे मनपाने करू नये असे म्हटले आहे. मनपानेही त्यांच्या वीज यंत्रणेची नियमित देखभाल करुन वीजपुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी, अशी अपेक्षा असल्याचे महावितरणने म्हटले आहे.

CMYK

# गुजराती गोलंदाजांपुढे लखनौच्या नवाबांनी टाकली नांगी


## ▪ हार्दिक पांड्याची अर्धशतकी खेळी.... गुजरातचा ७ धावांनी विजय

✔ सुराज्य/लखनौ

**अटीतटीच्या लढतीत गुजरातने लखनौचा सात धावांनी पराभव केला. १३५ धावांचा बचाव करताना गुजरातच्या गोलंदाजांनी अचूक टप्प्यावर मारा केला. लखनौच्या संघाने सात विकेटच्या मोबदल्यात १२८ धावांपर्यंत मजल मारली. केएल राहुलने एकाकी झुंज दिली. राहुलने ६१ चेंडूत ६८ धावांची खेळी केली. गुजरातने अखेरच्या पाच षटकात सामना आपल्या बाजूने फिरवला. मोहित शर्मा आणि मोहम्मद शमी यांनी अखेरच्या षटकात भेदक मारा केला. लखनौच्या संघाला अखेरच्या ४६ चेंडूत एकही चौकार अथवा षटकार मारता आला नाही.**



गुजरातने दिलेल्या १३५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना लखनौने दमदार सुरुवात केली. केएल राहुल आणि काइम मायर्स यांनी पहिल्या चेंडूपासूनच धावाचा पाऊस पाडला. विशेषकरुन मायर्सने हल्लाबोल केला. राहुल आणि मायर्स यांनी सहा षटकात ५५ धावांची सलामी दिली. मायर्स याने १९ चेंडूत २४ धावांची खेळी केली. या खेळीत त्याने एक षटकार आणि दोन चौकार लगावले आहेत. मायर्स बाद झाल्यानंतर कृणाल पांड्या आणि केएल राहुल यांनी लखनौचा डाव सावरला. कृणाल पांड्या आणि राहुल यांनीही अर्धशतकी भागिदारी केली. १४ षटकात लखनौने १०६ धावा केल्या होत्या. सामना लखनौ जिंकणार असेच वाटत होते.. पण नूर अहमद याने कृणाल पांड्याला बाद करत सामन्याचे चित्र पलटवले.



कृणाल पांड्या बाद झाल्यानंतर लखनौचा डाव कोसळला. दोन बाद १०६ नंतर अवध्या २० धावांत लखनौने आणखी पाच विकेट गमावल्या. कृणाल पांड्या बाद झाल्यानंतर निकोलस पूरन १, आयुष बडोनी ८, मार्कस स्टॉयनिस शून्य, दीपक हुड्डा दोन धावा काढून बाद झाले. केएल राहुल याने ६८ धावांचे योगदान दिले. केएल राहुल याने एकाकी झुंज दिली. पण राहुल याने ६१ चेंडूत ६८ धावा जोडल्या. राहुलचा स्ट्राईक रेट ११०च्या आसपास राहिला. जम बसलेला राहुल अखेरच्या षटकात मोक्याच्या क्षणी बाद झाला. त्यामुळे लखनौला पराभवाचा सामना करावा लागला. राहुलने ६८ धावांच्या खेळीत आठ चौकार लगावले आहेत. गुजरातने अखेरच्या पाच षटकात सामना फिरवला. नूर अहमद, राशिद खान, मोहित शर्मा आणि मोहम्मद शामी यांनी अचूक टप्प्यावर गोलंदाजी केली. चौकार आणि षटकार मारु दिले नाही. एकापाठोपाठ एक चेंडू निर्धाव टाकत लखनौच्या फलंदाजांवर दबाव निर्माण केला. लखनौच्या फलंदाजांना अखेरच्या ४६ चेंडूवर एकही चौकार अथवा षटकार लगावता आला नाही. गुजरातच्या गोलंदाजांनी अखेरच्या पाच षटकात सामना फिरवला. मोहित शर्माने २० व्या षटकात तीन विकेट घेतल्या. तर मोहम्मद शमीने १९ व्या षटकात फक्त ५ धावा दिल्या. गुजरातच्या गोलंदाजांनी अचूक टप्प्यावर मारा करत लखनौच्या फलंदाजांना बाद केले. पहिल्या दहा षटकांपर्यंत लखनौच्या फलंदाजांनी वर्चस्व निर्माण केले होते. पण अखेरच्या षटकात गुजरातच्या गोलंदाजांनी टिच्चून मारा केला. मोहित शर्मा आणि नूर अहमद यांनी प्रत्येकी दोन दोन विकेट घेतल्या. तर राशिद खान याने एक विकेट घेतली. लखनौचे दोन फलंदाज धावबाद झाले. मोहम्मद शामीने तीन षटकात १८ धावा दिल्या. जयंत यादवने चार षटकात २६ धावा खर्च केल्या. नूर अहमदन याने चार षटकात १८ धावा खर्च केल्या. हार्दिक पांड्याने एका षटकात सात धावा खर्च केल्या.



## राजराजेश्वरी संगीत विद्यालयात रंगली संगीत मैफिल

✔ **सोलापूर** : निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजराजेश्वरी संगीत विद्यालयात अक्षय तृतीयानिमित्त संगीत मैफिल रंगली. प्रथम संस्थापक अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या व महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य विजयकुमार हुल्ले, राजराजेश्वरी माध्यमिक प्रशालेचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार,पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, लक्ष्मीकांत त्रिशुले, ज्येष्ठ नागरिक कोल्हापुरे, काशिनाथ पुजारी,मल्लिनाथ पाटील आदी उपस्थित होते. यामध्ये स्वराली रॅका, भक्ती पुजारी, धानेश्वरी अचलेरे, प्रचिता श्रावण, रक्षिता सुंकनपल्ली, पूर्वा रेके, लहरीका गोने, साक्षी कुरापाटी, प्रतिभा पाटील, हेमा जुंजा, लावण्या मिसालोलू, कावेरी पगड्याल, वैष्णवी घंटे आदी बालकलाकारासह तबला शिक्षक लिंबाजी सुतार सहभाग घेतले होते. सूत्रसंचालन विश्वाराध्य मठपती यांनी केले. कार्यक्रमासाठी बसवराज सावळतोट, श्रीशैल कलशेट्टी, ओम मिस्कीन आदींनी परिश्रम घेतले.



## नातेपुते येथील अक्षय शिक्षण संस्थेचा वर्धापन दिन साजरा

✔ **नातेपुते** : नातेपुते येथील अक्षय शिक्षण संस्था संचलित चंद्रकांत घूगरदरे प्रशाला व ज्युनि कॉलेज माणिकबाई प्राथमिक विद्यामंदीर व प्रभावती गोखले बालकमंदिर यांचा २७ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. संस्थेचे चेअरमन रघुनाथ कवितके यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा उत्कर्षाराणी पलंगे, हनुमंतराव धालपे, माजी सरपंच अमरशील देशमुख, डॉ. विठ्ठल कवितके, डॉ. नरेंद्र कवितके, उमेश पलंगे, जवाहर डुंगोले, उत्तम बरडकर, संदीप बरडकर, बाहुबली चंकेश्वरा, नंदकुमार धालपे, शिवसेनेचे राजकुमार हिवरकर पाटील, ग्रामसेवक अरुण आवळे , राहुल पदमन, धनंजय पवार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक रवींद्र चांगण यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील शिक्षक यांनी केले होते. उन्हाची तीव्रता असल्यामुळे अल्पोपहार म्हणून उपस्थित मान्यवरांना थंड असा पन्हे सरबत देण्यात आला होता.



## पिलीव येथे महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

✔ **माळशिरस** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे महात्मा बसवेश्वर महाराजयांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. सकाळी समाजाच्या वतीने खंडोबा मंदिर याठिकाणी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले यावेळी विरशैव लिंगायत समाजाचे अध्यक्ष शुभजित नष्टे, उपाध्यक्ष रुषीकेश देशमुख, जयंती उत्सव समीतीचे अध्यक्ष संकेत देशमुख, माजी उपसरपंच नानासाहेब देशमुख, डॉक्टर तुषार गुळभिले, नवनाथ देशमुख, उमेश देशमुख, सुहास कोल्हे, अविनाश जेऊरकर, चंद्रकांत धसाडे,डव्होकेट वैभव मेथवडे, विजय सगरे आदी उपस्थित होते. यानंतर पिलीव ग्रामपंचायतीच्या वतीने महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंती निमित्त सरपंच नितीन मोहीते यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी उपसरपंच करमाळकर, ग्रामपंचायत सदस्या अनिता जेऊरकर, माजी उपसरपंच संजय आर्वे, अविनाश जेऊरकर, उमेश देशमुख, अध्यक्ष शुभजित नष्टे, नानासाहेब देशमुख, रुषीकेश देशमुख, गणेश देशमुख, विजय सगरे,रघुनाथ देवकर, दामोदर लोखंडे, सुभाष तुंगळे,ग्राम विकास अधिकारी अनिल सावळजकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



**सोलापूर शहरात शनिवारी बसवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त बसवेश्वर मध्यवर्ती मंडळातर्फे प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये डीजीच्या तालावर बसवप्रेमींनी जल्लोष केला.**



## परशुराम जयंती मध्यवर्ती महोत्सव मंडळाची मिरवणूक उत्साहात

✔ **सोलापूर** : परशुराम जयंती मध्यवर्ती महोत्सव मंडळाच्यावतीने काढण्यात आलेल्या परशुराम भगवानाच्या मिरवणुकीचे उद्घाटन राष्ट्रवादीचे नेते सुधीर खरटमल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मध्यवर्ती महामंडळाचे उत्सव अध्यक्ष व काँग्रेसचे ज्यष्ठ नेते राजन कामत, काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील रसाळे, शिवसेना ठाकरे गटाचे नेते विजय पुकाळे, अनंतराव जोशी, पुरुषोत्तम श्रींगादी, चक्रपाणी गज्जम, अमर कुलकर्णी, लालू खंडेलवाल, प्रसाद देवस्थळी, सुरेश कुंभार, शक्ती कटकधोंड व मंडळाचे सदस्य आदी उपस्थित होते.

## तुंगत येथील जानुबाई-बिरोबा यात्रेस प्रारंभ

### विविध कार्यक्रमांचे आयोजन



✔ **सोलापूर** : तुंगत येथील जागृत ग्रामदैवत म्हणून परिसरात प्रसिद्ध असलेल्या जानुबाई व बिरोबा देवाच्या यात्रेस शनिवार दि.२२ पासून सुरुवात होत आहे. सायंकाळी देवाची पालखी वाजत गाजत पुजारी मंडळी,मानकरी, भक्तगण व ग्रामस्थ यांच्यासह मंदिरात नेण्यात येते. रविवार दि.२३ हा यात्रेचा मुख्य दिवस मानला जातो, या दिवशी पहाटेपासून भक्तमंडळी आपले संकल्प पूर्ण करण्यासाठी तसेच आशीर्वाद मागणेसाठी घरापासून मंदिरापर्यंत ओल्या कपड्यांसह लोटांगण घालत दर्शनासाठी भक्तांच्या गर्दीचा ओघ सुरू होतो.

जानुबाई व बिरोबा यात्रा कमिटीच्या वतीने गावातील प्रमुख रस्त्यांवर,मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. रस्त्यांवर खेळणी,खाद्यपदार्थ विक्रेत्यांची छोटी मोठी दुकाने थाटण्याची लगबग सुरू झाली आहे, मनोरंजनासाठी रविवार दि.२३ रोजी सायं. 'लावण्यखणी' सोमवार दि.२४ रोजी नामवंत मल्लांच्या कुस्त्या, मंगळवार दि. २५ रोजी सायं. 'आर्केस्ट्रा ' , बुधवार दि.२६ रोजी सायं. अविनाश भारती यांचे व्याख्यान, शुक्रवार दि.२७ रोजी सायं. ह.भ.प. हंडे महाराज यांचे कीर्तन आयोजित केले आहे.

यात्रेच्या निमित्ताने ग्रामपंचायतीने गावातील रस्ते,मंदिर परिसरात स्वच्छता, दिवाबत्ती ,पिण्याचे पाणी, तसेच गर्दीच्या ठिकाणी पुरूष मुतारी, कचराकुंडीची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती ग्रामसेवक एस.एम.चेंडगे यांनी दिली , यात्रा कमिटीचे युवराज रणदिवे ,विजय सुरवसे,गजेंद्र रणदिवे,दत्तात्रय रणदिवे हे यात्रा व्यवस्थित पार पाडण्यासाठी प्रयत्नशील असून यात्रेकरू भाविक भक्तगणानीं दर्शनाचा आणि प्रसादाचा ,मनोरंजनाचा लाभ घ्यावा असे आवाहन कमिटीचे वतीने करण्यात आले आहे.

## दै.सुराज्यचे पत्रकार सर्वगोड यांना जि.प. आदर्श पत्रकार पुरस्कार प्रदान

✔ **सोलापूर** : 'सुराज्य'चे प्रतिनिधी बळीराम सुंदरअप्पा सर्वगोड यांना जिल्हा परिषदेचा आदर्श पत्रकारिता पुरस्कार शनिवारी जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार सन २०२१-२२ या सालचा आहे. पत्रकारिता करत असताना जिल्हा परिषदेतील आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, समाज कल्याण विभाग आदी विभागांमधील वृत्तांकन सर्वगोड यांनी केले आहे. शिक्षकांचे प्रश्न, आरोग्य विभागातील डॉक्टर आणि इतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न याबाबत वृत्तांकन केले होते. जिल्हा परिषदेच्या वतीने



दरवर्षी जिल्हा परिषद बीटवर काम करणाऱ्या पत्रकारांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार देवून प्रशासनाच्यावतीने सन्मान करण्यात येतो.

या पुरस्काराचे स्वरूप शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि रोख रक्कम अशा स्वरूपाचा हा पुरस्कार आहे. या कार्यक्रमाच्या वेळी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) ईशादिन शेळकंदे, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, खरात, ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी, प्राध्यापक डॉ. रवींद्र चिंचोळकर, महेश कोठीवाले, मराठा सेवा संघाचे अविनाश गोडसे, सचिन जाधव आदी उपस्थित होते.

## बसवराज कुगणे यांचे निधन

✔ **दक्षिण सोलापूर** : भंडारकवठे (ता. दक्षिण सोलापूर) येथील बसवराज पिरप्पा कुगणे यांचे शनिवार रोजी दुपारच्या दरम्यान वृध्दापकाळाने निधन झाले असून ते ७५ वर्षांचे होते. ग्रामपंचायत सदस्य आणि वळसंगच्या स्वामी समर्थ सुत गिरणीचे संचालक म्हणूनही काम केलेले आहेत. माजी आ. स्व. वि. गु. शिवदारे यांचे समर्थक होते. येथील ग्रामदैवत श्री. महासिध्द देवाचे मानकरी देखील होते. त्यांच्यावर आज २३ एप्रिल रोजी सकाळी दहाच्या सुमारास भंडारकवठे येथे अंत्यसंस्कार होणार आहे. त्यांच्यामागे पत्नी व दोन पुतणे असा परिवार आहे.



## शिक्षिकांची महिला सक्षमीकरण व गुणवत्तावाढ कार्यशाळा

✔ **सोलापूर** : सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात उत्तर सोलापूर तालुक्यातील शिक्षिकांची महिला सक्षमीकरण व गुणवत्तावाढ कार्यशाळा संपन्न झाली.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या कार्यशाळेचा उद्देश फक्त महिला सक्षमीकरण नसून विद्यार्थ्यांची गुणवत्तावाढ हाही उद्देश आहे. त्याचप्रमाणे आपण सर्व शिक्षिका नेहमीच्या कर्तव्यात व्यस्त असता तुम्हा सर्वांचे एक गेट टुगेदर व्हावे आणि




विचारांचे आदानप्रदान व्हावे यासाठीही ही कार्यशाळा आयोजित केली आहे. याप्रसंगी सिंहगड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नवले, गटशिक्षणाधिकारी सिध्देश्वर निंबर्गी, बाल विकास प्रकल्प अधिकारी समाधान नागणे, गीता परिवाराच्या संगीता जाधव, शिक्षण विस्तार अधिकारी बापूराव जमादार, स्वाती स्वामी, गोदावरी राठोड, प्रकाश राचेट्टी आदी उपस्थित होते.



## आ. सुभाष देशमुख यांच्याकडून बसवेश्वरांना अभिवादन

✔ **सोलापूर** : आ. सुभाष देशमुख यांनी बसवेश्वर जयंतीनिमित्त कौंतम चौकातील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी त्यांच्यासोबत के.के. प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोमनाथ केंगनाळकर, माजी नगरसेवक जगदीश पाटील, विशाल गायकवाड, महेश देवकर, अक्षय अंजीखाने आदी उपस्थित होते. बाराव्या शतकात समाजाला समतेचा संदेश देणारे बसवेश्वर खऱ्या अर्थाने समतानायक होते.

समाजसुधारणांची बिजे रोवणारे ते पहिले समाजसुधारक होते. असे सांगत आ. देशमुख यांनी सर्वांना बसवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सोमनाथ केंगनाळकर यांनी म.बसवेश्वरांचा आदर्श सर्वांनी घेऊन आचरण करावे, असे आवाहन केले.

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, डिा व सब डिा सोलापूर तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे मुळेगाव येथील गट नं./ भुमापन क्रमांक व उपविभाग १०९ यामधील मे अनंत स्टार्च प्रोडक्टस लि. सोलापूर लिक्कीडेशन कमिटीतील केन्व्हेनर म्हणून जयेंद्र रामानुजम द्यावनपल्ली या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संस्थेतील प्लॉट नं. २५२ ते २५६ यांचे एकूण क्षेत्र ११६२०.८० चौ. मी.

१. प्लॉट नं. २५२ याची हद्द पूर्वपश्चिम १८ मी व दक्षिणोत्तर १२ मी. यांसी एकुण क्षेत्र २१६ चौ. मी. यांसी चतुःसिमा पूर्वेसः- प्लॉट नं. २१५, पश्चिमेसः- सोलापूरची महानगरपालिकेची हद्दी, दक्षिणेस :- रस्ता, उत्तरेस :- प्लॉट नं. २५३

२. प्लॉट नं. २५३ याची हद्द पूर्वपश्चिम १८ मी. दक्षिणोत्तर १२ मी. यांसी एकुण क्षेत्र २१६ चौ. मी. यांसी चतुःसिमा पूर्वेसः- प्लॉट नं. २१५ व रस्ता, पश्चिमेसः- सोलापूरची महानगरपालिकेची हद्दी, दक्षिणेस :- प्लॉट नं. २५२, उत्तरेस :- प्लॉट नं. २५४,

३. प्लॉट नं. २५४ याची हद्द पूर्वपश्चिम १८ मी. दक्षिणोत्तर १२ मी. यांसी एकुण क्षेत्र २१६ चौ. मी. यांसी चतुःसिमा पूर्वेसः- प्लॉट नं. ९ मी. रस्ता, पश्चिमेसः- सोलापूरची महानगरपालिकेची हद्दी, दक्षिणेस :- प्लॉट नं. २५३, उत्तरेस :- प्लॉट नं. २५५,

४. प्लॉट नं. २५५ याची हद्द पूर्वपश्चिम १८ मी. दक्षिणोत्तर १२ मी. यांसी एकुण क्षेत्र २१६ चौ. मी. यांसी चतुःसिमा पूर्वेसः- प्लॉट नं. ९ मी. रस्ता, पश्चिमेसः- सोलापूरची महानगरपालिकेची हद्दी, दक्षिणेस :- प्लॉट नं. २५४, उत्तरेस :- प्लॉट नं. २५६,

५. प्लॉट नं. २५६ याची हद्द पूर्वपश्चिम १८ मी. व दक्षिणोत्तर १२ मी. यांसी एकुण क्षेत्र २१६ चौ. मी. यांसी चतुःसिमा पूर्वेसः- प्लॉट नं. ९ मी. रस्ता, पश्चिमेसः- सोलापूरची महानगरपालिकेची हद्दी, दक्षिणेस :- प्लॉट नं. २५५, उत्तरेस :- सोलापूर हैद्राबाद राष्ट्रीय महामार्ग

येणेप्रमाणे यांत चतुःसिमेतील मिळकत खुलीजागा व या मिळकतीस असलेल्या स्वतंत्र वहिवाटीच्या व इजमेंटच्या हक्कासह तसेच इतर तंद्गभूत वस्तुसह ही मिळकत मे अनंत स्टार्च प्रोडक्टस लि. सोलापूर लिक्कीडेशन कमिटीतील केन्व्हेनर म्हणून जयेंद्र रामानुजम द्यावनपल्ली यांचे मालकीचे व कब्जे वहिवाटीचे असून त्यांनी आमचे अशिल यांना खूषखरेदीने देण्याचे ठरले असून आमच्या अशिलांकडून टोकन रक्कम स्वीकारलेली आहे. तसेच सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याचे खात्री व हमी आमचे अशिलांस दिलेली आहे.

सबब या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वर नमुद मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, भाडे, लिव्ह अ‍ॅण्ड लायसेन्स, बक्षिस, साठेखत, खरेदीखत, पोटगी टाच, जप्ती या व इतर अन्य कोणत्याही स्वरुपाचे बोजा, हक्क व हितसंबंध असल्यास अथवा सदर मिळकतीसंबंधी कोणाचेही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील नमुद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी वैध हरकती नोंदवावीत. सदर मुदतीत कोणाचेही कसलीही तक्रार व हरकत न आल्यास सदरची मिळकत ही संपुर्ण निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे. असे गृहीत धरुन आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही हरकत आल्यास ते आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. ता. २२/०४/२०२३

सही/-

**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

**ॲडव्होकेट धनंजय विष्णू वांझरे**

प्लॉट नं. १, देना लक्ष्मी हौसिंग सोसायटी, जुना विडी घरकुल, हैद्राबाद रोड, रेणुका नगर जवळ, सोलापूर ४१३००५

मो. ९०११७८०४५३

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# नाले दुरुस्तीसाठी १८ कोटींचा प्रस्ताव सरकारकडे पाठवला

## मनपाकडून नाले देखभाल दुरूस्तीचे नियोजन

✔ सुराज्य/सोलापूर

पावसाळ्यातील समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी महापालिकेने शहरातील नाले ट्रेनिंग म्हणजे देखभाल-दुरुस्ती करण्याचे नियोजन सुरू केले आहे. महापालिकेने शहरातील एकूण नाल्यांपैकी पहिल्या टप्प्यातील १९ नाल्यांसाठी ९८ कोटींचा प्रस्ताव राज्य सरकारकडे सादर केला आहे.

सोलापूर शहरात एकूण ५१ आले आहेत. मागील ३२ वर्षात महापालिका प्रशासनाकडून एकाही नाल्याची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. या कालावधीत शहराची वाढती लोकसंख्या, वसाहत यामुळे शहर हद्दीतून वाहणाऱ्या नाल्यांची मोठी समस्या पावसाळ्यात दिसून येते. शहरातील नाले तुंबणे, एक-दोन मोठ्या पावसांतच हजारो लोकांच्या घरात पाणी शिरते आदी समस्या निर्माण होतात.



पावसाळ्यात शहरातील ७१ ठिकाणी १०३२ घरे नाल्याच्या पाण्यामुळे बाधित होतात. ३० वर्षांनंतर जाग आलेल्या महापालिका प्रशासनाने शहरातील ५१ नाल्यांच्या ट्रेनिंगकरिता २०१४-१५ मध्ये २०६ कोटींचा विकास आराखडा तयार केला होता. महापालिकेची आर्थिक स्थिती नसल्याने शासनाकडे सुवर्णजयंती महाअभियान योजनेंतर्गत नगरोत्थानमधून निधीची मागणी करण्यात आली. मात्र, या योजनेत १०० कोटींच्या आतील कामे करण्यात येणार असल्याने ५१ नाल्यांची तीन टप्प्यात विभागणी करण्यात आली. २०१६ मध्ये पहिल्या टप्प्यातील ३० नाल्यांकरिता ९५.४७ कोटींचा विकास आराखडा तयार करून शासनाकडे प्रस्ताव दाखल केला. त्या प्रस्तावामध्ये अनेक त्रुटी काढत शासनाने त्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी महापालिकेला कळविले. या त्रुटींची पूर्तता करून नगरअभियंता विभागाने २०१८ मध्ये फेरप्रस्ताव सादर केला. गेली दोन वर्षे हा प्रस्ताव धूळखात पडून राहिला. दरम्यान, शहरातील अत्यावश्यक आणि महत्त्वाच्या नाला ट्रेनिंगसाठी फेरप्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले. त्यानुसार, शहरातील १९ नाल्यांसाठी ९८ कोटींचा प्रस्तावाला उपसमितीमध्ये मंजुरी देऊन तो शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

## महिलेला दुचाकीची धडक

✔ **सोलापूर** : मॉर्निंग वॉक करत असताना विरूध्द दिशेने एक दुचाकीस्वार येऊन त्याने हायगयीने व निष्काळजीपणे फिर्यादी रोहिनी धनंजय कुलकर्णी (वय-५५,रा.शिवगंगा नगर, जुळे सोलापूर) यांची मैत्रीण कविता रसाळ यांना धडक दिली.यात कविता यांच्या डाव्या गुडघ्याला,चेहऱ्यावर मार लागला.तसेच मनगटाचे हाड क्रॅक झाले आहे.याप्रकरणी एका दुचाकी स्वारावर गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना चैतन्य भाजी मार्केट परिसरात घडली.या तपास पोलीस हावालदार सोनार करत आहेत.

## जिल्हा परिषदेतील बसवण्णांची प्रतिमा प्रेरणा देईल : स्वामी

✔ सुराज्य/सोलापूर

बाराव्या शतकात समाजाला समतेचा संदेश देणारे ते खऱ्या अर्थाने समतानायक होते. समाजसुधारणांची बीजे रोवणारे ते पहिले समाजसुधारक होते. त्यांनी अनेक तलाव खोदले, अन्नदासोह सुरू केले, गरिबांसाठी दवाखाने असे अनेक समाजोपयोगी कार्य केले. जिल्हा परिषदेतील बसवण्णांची प्रतिमा लोकोपयोगी, लोककल्याणकारी कामे करण्यास प्रेरणा देईल असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.



वीरशैव व्हिजनतर्फे जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात लावण्यासाठी जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांची प्रतिमा देण्याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी मंचावर ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशादीन शेळकंदे, रवींद्र चिंचोळकर, बसव व्याख्याते महेश कोटीवाले उपस्थित होते. यावेळी वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले यांच्या हस्ते व सहकोषाध्यक्ष विजयकुमार बिराजदार, अमित कलशेट्टी, युवक आघाडी अध्यक्ष विजयकुमार हेले, सचिन विभुते जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांची प्रतिमा मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. याप्रसंगी मराठा सेवा संघटना अध्यक्ष अविनाश गोडसे, राजकुमार सारणे, लक्ष्मीकांत पुजारी उपस्थित होते. सूत्रसंचालन गुरव यांनी केले.

## तरुणाला मारहाण

✔ **सोलापूर** : तरुणाच्या डोळ्यात चटणीची पूड घालून मारहाण केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत परशुराम सोमण्णा मादगुंडी (वय-२७,रा.नई जिंदगी) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.ही घटना १८ एप्रिल रोजी देसाई नगर येथे घडली.पूर्व वैमानस्यातून आरोपी दुर्गा श्रीराम,रितेश (दोघे रा.शांती नगर,मजरेवाडी) यांनी फिर्यादी मादगुंडी यांच्या डोळ्यात चटणीची पूड टाकून माहाण केली. तपास पो.स.ई. रजपूत करत आहेत.



## आ. आसगावकर यांच्या निधीतून देवकते प्रशालेस शैक्षणिक साहित्य

✔ सुराज्य/सोलापूर

वडजी (ता.द.सोलापूर) येथील आनंदराव देवकते प्रशालेस आमदार जयंत आसगावकर यांच्या स्थानिक निधीतुन प्रशालेस शैक्षणिक साहीत्य प्रिंटर देण्यात आले. यावेळी श्रावण बिराजदार, चापले, ढाले, प्रशालेचे मुख्याध्यापक कल्याण गजबार, शाळा विभाग प्रमुख श्रीमंत हक्के, सुरेन्द्र कांबळे, आनंद भिमन्वरु, लक्ष्मण चिवरे आदी उपस्थित होते. संस्थेचे मार्गदर्शक विश्वास गजबार, शाळा समितीचे अध्यक्ष विठ्ठल हक्के, पालक व ग्रामस्थांच्या वतीने आमदार जयंत आसगांवकर यांचे आभार मानण्यात आले.

## ग्लेनमार्क लाइफ सायन्सतर्फे सॅनिटरी पॅड डिस्पोझेबल मशिन वाटप

✔ सुराज्य/सोलापूर

ग्लेनमार्क लाइफ सायन्स या संस्थेतर्फे नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाइंड लातूर शाखेच्या संयुक्त विद्यमाने डॉ. मेतन फाऊंडेशनतर्फे आयोजित केलेल्या कार्यक्रमात सोलापुरातील पंधरा शाळेला / कॉलेजला सॅनिटरी पॅड डिस्पोझेबल मशीन कुलुगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या हस्ते मोफत देण्यात आले.

ग्लेनमार्क लाइफ साईन्स या संस्थेतर्फे येत्या तीन महिन्यात त्यांच्या सी एस आर फंडातून सोलापूर जिल्ह्यातील ६०० शाळा, कॉलेज,वसतिगृहांना सॅनिटरी पॅड डिस्पोझेबल मशीन वाटप केले जाणार आहे.



सोमेश्वर लवंगे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. व्यंकटेश मेतन यांनी या हा या उपक्रमासाठी शाळा, कॉलेज याची निवड कशी केली व या कार्यक्रमाचे नियोजन याबद्दल माहिती दिली. या उपक्रमाबद्दल प्रस्तावना मांडताना डॉ. विजयकुमार राठी यांनी या प्रकल्पाची विस्तृत माहिती दिली. त्यांनी या मशीनचा उपयोग कसा करायचा याचे प्रात्यक्षिक दिले. डॉ. सौ. मृणालिनी फडणवीस यांनी या उपक्रमाची प्रशंसा केली. यावेळी जॉन सालवे, अरविंद गिरी, एस आर बेलदार, डॉ. विजयकुमार राठी, डॉ. व्यंकटेश मेतन, आशिष बाहेती, इ. सांगवे, पुखराज दर्डा, सोमेश्वर लवंगे, सिद्धाराम सक्करगी, चिदानंद मुस्तारे, महेश बनसोडे, मुकुंद कुलकर्णी, हे उपस्थित होते.

## शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी राज्यस्तरीय कार्यशाळेत सीईओ स्वामींना निमंत्रण

✔ सुराज्य/सोलापूर

समग्र शिक्षा व स्टार्स प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणी करिता क्षेत्रीय अधिकारी यांची घेण्यात येणाऱ्या दोन दिवसीय निवासी कार्य शाळेसाठी जि प. चे सीईओ दिलीप स्वामी यांना लोणावळा येथील कार्यशाळेसाठी निमंत्रित करण्यात आले आहे.

दि. २८ आणि २९ एप्रिलमध्ये व्हॅली सीटी लोणावळा येथे कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेस शालेय शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) यांच्यासह शिक्षण



विभागातील सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित असणार आहेत.

मागील दोन वर्षात कोविड २०१९ मुळे राज्यातील मुलांच्या शिक्षणाची हानी झाल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता यावर शिक्षण क्षेत्रात कार्यरत सर्व घटकांनी एकत्र चर्चा करून गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्नपूर्वक कार्यवाही करण्यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात येत असल्याचे सुरज मांढरे यांनी सांगितले. महाराष्ट्र शासनाने हे वर्ष गुणवत्तावृद्धी वर्ष म्हणून घोषित केलेले आहे. तसेच केंद्र शासनाने सुद्धा निपुण भारत अभियान प्रभावीपणे राबविणेबाबत वारंवार सूचित केले आहे. नुकतेच शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकर हे सोलापूर दौऱ्यावर आले असताना पंढरपूर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी त्यांनी राबविलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांचे सादरीकरण केले होते. यानंतर सांगोला येथील ग्रामीण साहित्य संमेलनाला संबोधित करताना ही कार्यशाळा आयोजित करण्याचा मनोदय व्यक्त केला होता. त्याचप्रमाणे सीईओ स्वामी यांनी राबविलेल्या शैक्षणिक उपक्रमांचे कौतुक करून या कार्यशाळेत सादरीकरणासाठी सीईओ स्वामींना निमंत्रित केले जाणार असल्याचे सांगितले होते.

## महापुरुषाबद्दल अपशब्द ; एकावर गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : महापुरुषाबद्दल अपशब्द लिहून त्यावर रॅप साँग करत समाजाच्या भावना दुखावल्या प्रकरणी सोशल मिडिया वापरकर्त्यावर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत सुमीत शिवशरण (वय-३०,रा. न्यू बुधवार पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.फिर्यादी शिवशरण यांच्या मोबाईलवरील सोशल मीडियावर एक व्हिडिओ आला.त्यात एका सोशल मीडिया वापरकर्त्याने एक व्हिडिओ शेअर केला होता.त्यात रॅप साँग तयार करून जन समाज व दोन जातीमध्ये तेढ निर्माण होईल असे कृत्य केले,अशा आशयाची फिर्याद शिवशरण यांनी दिली आहे.या फिर्यादीवरून सोशल मीडिया वापरकर्त्यावर गुन्हा दाखल झाला आहे. तपास पो. नि. विकास देशमुख करत आहेत.

## पीआरएफच्यावतीने महिलांना साड्या वाटप

✔ सुराज्य/सोलापूर

विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पीआरएफच्यावतीने महिलांना साड्या वाटप करण्यात आले.

यावेळी आंबेडकर मध्यवर्ती विश्वस्त समिती व उत्सव समितीचे अध्यक्ष शिवम सोनकांबळे, उद्योजक कपिल पिसे, पीआरएफ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रफुल्ल फडतरे, वैयक्तिक साम्राज्य प्रतिष्ठानचे संस्थापक समाधान आष्टळ, अनिश गायकवाड, हर्षद कोळी, दत्ता शिंदे, अक्षय कांबळे, बापू खंदारे, अक्षय आष्टळू, चित्रा नेटके, माधुरी गोसावी, सविता फडतरे, सुनीता कोळेकर, अंकिता यादव, बाई खंदारे, सुनीता देवकुळे, नागूबाई गवळी, तेजाबाई सरसे, जगताप व महिला वर्ग उपस्थित होते.

## घरासमोरील दुचाकीची चोरी

✔ **सोलापूर** : जुना विडी घरकुल परिसरातील पोशम्मा मंदिर परिसरातील जगदीश रामस्वामी चिन्नी (वय-५२,रा. जुना विडी घरकुल) यांच्या घरासमोर लावलेली दुचाकी क्र.एमएच.१३.डीसी.६२१० ही अज्ञात चोराने चोरली.ही घटना २० एप्रिल रोजी घडली.या बाबत चिन्नी यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.या फिर्यादीवरून अज्ञात चोरावर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोलीस नाईक गायकवाड हे करत आहेत.

## बसवेश्वरांना स्मारक समिती आणि शिवा संघटनेकडून अभिवादन

✔ सुराज्य/सोलापूर

महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त लिंगायत समाजाच्या विविध संघटनांच्या वतीने सोलापुरातील महात्मा बसवेश्वरांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

सकल लिंगायत महासमितीचे राज्य समन्वय डॉ.बसवराज बगले, शिवा संघटनेचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष राजकुमार सारणे, प्रमुख संघटक लक्ष्मीकांत पुजारी, जुळे सोलापूर मध्यवर्ती जन्मोत्सव महामंडळाचे अध्यक्ष चन्नप्पा गुरुभेट्टी, नगरसेवक



वैभव हत्तुरे, आनंद मुरस्तारे समाजसेवक परमेश्वर माळगे,अजिंक्य उप्पीन,डॉ.मल्लिकार्जुन तरनळी, सिध्दाराम चाकोते, सुरेश हत्ती, बाळराजे बगले आदिंनी विविध ठिकाणच्या मंडळांना भेटी दिल्या.

## सोलापूरच्या गोंधळी समाजातील दोन सुपूत्र झाले तहसीलदार

### मुलांनी केला आईचा सन्मान

✔ सुराज्य/सोलापूर

लहान वयातच वडीलांचे छत्र हरपलेल्या मुलांना मोलमजुरी करुन अगदी जिद्दीने शिकवून तहसीलदार पदापर्यंत पोहोचविणाऱ्या आईचा सन्मान सोलापूरच्या गोंधळी समाजातील दोन सुपूत्रांनी केला .

सोलापूर येथील रविवार पेठ येथे राहणाऱ्या गोंधळी समाजातील नागनाथ पांडुरंग भोसले व संजय पांडुरंग भोसले या दोन बंधूची नुकतीच तहसीलदारपदी पदोन्नती झाली . ही मुले ९ - १० वर्षाची असतानाच वडिलांचे छत्र हरपले . त्यावेळी लोकांनी मुलांना शाळा सोडून भंगार गोळा करायला लावा असा सल्ला दिला . पण जिद्दी आईने या दोघांसह एक मुलगी व



एक दिड वर्षाच्या लहान मुलाला घेवून सुरुवातीला भांडी विकण्याचा व्यवसाय केला व मुलांना शिकविले. पुढे त्यांना सोलापूर महानगरपालिकेत नोकरी लागली . त्यावेळी त्यांनी मुलांना अधिकारी बनविण्याचे स्वप्न पाहिले .

दैवयोगाने मुलांना महसूल विभागात लिपीक व मंडल अधिकारी म्हणून नोकरी मिळाली . पुढे ते नायब तहसीलदार झाले व नुकतीच त्यांना तहसीलदारपदी शासनाने पदोन्नती दिली . त्यावेळी आईला आपले अश्रू अनावर झाले . या दोन्ही मुलांनी सोलापूर येथे आईची भेट घेवून तीचा सन्मान करीत आपल्या पदोन्नतीचे यशाचे खरे श्रेय तीचेच असल्याचे सांगितले . त्यांना मिळालेल्या पदोन्नतीचे सर्वच स्तरातून स्वागत होत आहे.

## हत्तुरमध्ये आंबेडकर जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

✔ सुराज्य/सोलापूर

न्यू सिध्दार्थ तरूण मंडळ, हत्तुर, ता. दक्षिण सोलापूर व उत्तम सोशल फाऊंडेशन सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने भीम गीतांचा भीम जागर कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती हत्तुरचे सरपंच ज्योती कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

यावेळी अण्णाप्पा सतबुर, शिवयोगी व्हनमाने केतन शहा, अनिता कांबळे, विक्रम खेलबुडे, डॉ. महेंद्र गायकवाड आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी संयोजक आनंद सीताफळे, प्रा. डॉ. प्रदीप गायकवाड, व शांतीसागर सरवदे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन विद्या कदम यांनी केले. उपस्थित पाहुण्यांचा आभार दीपक आठवले यांनी केला.

**आहेरवाडी येथे आंबेडकर जयंती**

भारतीय संविधानाचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य तुप्पद जी. आर. यांनी भूषविले. तसेच प्रतिमेचे पूजन संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर दिंडोरे यांनी केले. यानंतर प्रियदर्शनी जाधव हिने बुद्धवंदना गायन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल माहिती सांगितली.



## भावना ऋषी नागरिक आरोग्य केंद्रात वॉटर कुलरची सोय

✔ **सोलापूर** : म. बसवेश्वर यांच्या जयंती दिनानिमित्त 'महापालिकेच्या वीरशैव सेवक सेवा संघाच्या वतीने भावना ऋषी नागरिक आरोग्य केंद्र येथे हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या लोकांसाठी वॉटर कुलर बसविण्यात आले असून त्याचे उद्घाटन महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या हस्ते तर अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे नगर अभियंता लक्ष्मण चलवादी, माजी महापौर शोभाताई बनशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी आरोग्य अधिकारी डॉ. बसवराज लोहारे,माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडे मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, वाहन अधीक्षक मेंडगुळे, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी विठ्ठल कस्तुरे आदी उपस्थित होते. यावेळी देवांश क्षीरसागर पर्यावरण संवर्धनचा संदेश दिला असल्यामुळे सोमपा कडून सायकल भेट देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.यावेळी प्रास्ताविक सेवक संघाचे अध्यक्ष केदारनाथ गोटे यांनी केले. यावेळी वीरशैव सेवक संघाचे अध्यक्ष केदारनाथ गोटे, सचिव अशोक बिराजदार, संजय सावळगी, नागेश धरणे, गणेश बिराजदार आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रभुलिंग पुजारी यांनी केले. तर आभार प्रदर्शन अशोक बिराजदार यांनी मानले.



## गोपाबाई दमाणी रक्त केंद्रात रक्त विघटन मशीन

✔ **सोलापूर** : इंडियन रेड क्रॉस सोसायटी सोलापूर शाखा संचलित गोपाबाई दमाणी रक्त केंद्र येथे नवीन सेंट्रिफ्युज मशीन चा लोकार्पण सोहळा उद्योजक राम रेड्डी यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी इंडियन रेड क्रॉस सोसायटी सोलापूर शाखेचे डॉ. राजीव प्रधान, जयेश पटेल, खुशाल देढिया, किशोर चांडक, गुरुसलिंग कन्नुरकर, डॉ. शिरीष कुमठेकर, राजीव देसाई, सुहासिनी शाह,डॉ श्रीकांत येळेगावकर , संदीप जव्हेरी आदी उपस्थित होते. दमाणी रक्त केंद्रामध्ये सध्या उपलब्ध दोन रक्त विघटन मशीन च्या तुलनेत हे अधिक वेगाने व अधिक कप्स असलेले नवीन मशीन कार्यान्वित झाले आहे. बालाजी स्पेशालिटी केमिकल्स च्या सीएसआर निधीतून हे मशीन बसविण्यात आले आहे.



## प्रबुद्ध भारत तरुण मंडळातर्फे बसवेश्वरांना अभिवादन

✔ **सोलापूर** : प्रबुध्द भारत चौक मिलिंद नगर, थोरला राजवाडा बुधवार पेठ, सोलापूर येथे प्रबुध्द भारत तरुण मंडळाच्या (पी.बी.ग्रुप) वतीने म. बसवेश्वरांना अभिवादन करण्यात आले. उद्योजक पी.आर. बनसोडे यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक आनंद चंदनशिवे यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या सामाजिक कार्याबद्दल मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी अध्यक्ष अमित बनसोडे, बाबरे, सामाजिक कार्यकर्ते श्रीमंत जाधव, बापू शिंदे, विजयकुमार बाबरे, विनोद शेंडगे, विजय इंगळे, श्रीकांत वाघमोडे, विजय आनंद इंगळे, नाना कापुरे, प्रवीण कसबेकर आदी उपस्थित होते.



## ठाकरे गटाच्यावतीने म. बसवेश्वरांचे पूजन

✔ **सोलापूर** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त श्री बसवेश्वर चौकातील आश्वारूढ पुतळ्यास जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम बरडे यांच्या हस्ते व शहर प्रमुख विष्णू कारमपुरी उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय वानकर यांच्या प्रमुख उपस्थित पूजन करण्यात आले. याप्रसंगी संतोष केंगनाळकर, संदीप बेळमकर, विजय पुकाळे, सोमनाथ शिंदे, नगरसेवक भारत बडूरवाले, संभाजी कोंडगे, रेवन बुक्कानुरे, गुरुनाथ कोळी, सुशील कन्नूर, लहू गायकवाड, संजय साळुंखे आदी उपस्थित होते.

**बौध्द महासभेतर्फे आंबेडकर जयंती साजरी**

दि बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौध्द महासभा जिल्हा व शहर शाखा सोलापूर यांच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. न्यू बुधवार पेठ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानसमोर प्रतिमेचे पूजन करुन रॅलीला सुरुवात करण्यात आली. बौद्धांचा दानमय बुद्ध विहार प्रेरणाभूमी येथील अस्थिविहार, मिलिंद नगर बुद्ध विहार याठिकाणी बौद्ध महासभेच्यावतीने समता दैनिक दलाच्यावतीने बुद्धवंदना घेण्यात आली. त्याचप्रमाणे सोलापूर जुनी नगरपलिका येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. रॅली पार्क येथील डॉ. आंबेडकर चौक पुतळ्याजवळ आल्यानंतर संस्थेचे जिल्हाध्यक्ष आण्णासाहेब वाघमारे व जिल्हा सरचिटणीस नागसेन माने यांच्या हस्ते बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

# राजकारणाचे उद्योग उद्योगाचे राजकारण



सध्या संपूर्ण देशात अत्यंत तापलेला विषय म्हणजे हिंडेनबर्ग आणि हिंडेनबर्गने केलेल्या दाव्यामुळे गल्लीपासून दिल्लीपर्यंत प्रत्येकाच्या टीकेचे धनी बनलेले जगातील श्रीमंत उद्योगपतींपैकी एक असलेले भारतीय उद्योगपती गौतम अदानी. याच गौतम अदानींमुळे यंदाचे संसदेचे पावसाळी अधिवेशन जवळजवळ वाया गेले. सभागृह चालवण्याची जबाबदारी ही सत्ताधाऱ्यांची असते. मात्र जेव्हा विरोधकांनी अदानींचा विषय आणला; तेव्हा सभागृह चालू नये म्हणून गोंधळ घालण्याची वेळ सत्ताधाऱ्यांवर आली. कारण सत्ताधाऱ्यांना विरोधकांच्या प्रश्नाचे उत्तर देता येत नव्हते. ज्या अदानींमुळे देशाची संसद बंद पाडली जाते; ते अदानी सत्ताधाऱ्यांना एवढे जवळचे का आहेत? उद्योगपती राजकीय पक्षांना जवळ का करतात? किंवा राजकीय पक्षांना उद्योगपती आपल्या जवळ असावेत असे का वाटते? या प्रश्नाचे उत्तर शोधताना राजकारणाचे उद्योग आणि उद्योगाचे राजकारण या अनुषंगाने राजकारणी आणि उद्योजक यांच्यातील संबंधांवर प्रकाश टाकणारा संडे स्पेशलचा खास वृत्तांत फक्त 'सुराज्य'च्या वाचकांसाठी.

सत्ता कोणत्याही पक्षाची असो, सत्ताधारी पक्षाच्या ढेपेला उद्योगपतींचे मुंगळे चिकटलेले पाहयला मिळतात. राज्यकर्ते आणि उद्योगपती यांचे मैत्रीपूर्ण संबंध हमखास असतातच. किंबहुना सत्ताधारी आणि उद्योगपती हे एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. सत्ताधारी म्हटले की सत्ताधारी पक्षाच्या आजूबाजूला घोंगावणाऱ्या उद्योजगपतींचे टाळके असतेच. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर उद्योगपती हे सत्ताधारी पक्षाशी मैत्री करण्यासाठी आसूसलेले असतातच. या दोघांना एकमेकांकडे खेचणारी अर्थशक्ती ही याठिकाणी चुंबकासारखी काम करत असते. दोघांनाही आर्थिक हव्यास असतो. सत्ताधाऱ्यांना सत्ताकारण करण्यासाठी आणि उद्योगपतींना त्यांचे अर्थकारण करण्यासाठी एकमेकांची आवश्यकता असते. त्यातूनच जिथे सत्ताधारी; तिथे उद्योगपती आणि जिथे उद्योगपती तिथे राजकारणी हे भारतीय लोकशाहीत सार्वकालिक सत्य होऊन बसले आहे.

## मतांसाठी पैसा अन् उद्योगांसाठी सवलत




राजकारणी आणि उद्योगपती यांच्या मैत्रीला अर्थकारणाची जोड असते. राजकारण्यांना निवडणुका लढवाव्या लागतात, निवडणुका जिंकून सत्ता मिळवायची असते. निवडणुका जिंकण्यासाठी पैसा लागतो. हा पैसा उद्योगपती विविध माध्यमातून राजकीय पक्षांना पुरवत असतात. कारण उद्योगपतींना उद्योगधंदा करायचा असतो. त्यासाठी सरकारकडून विविध सवलती हव्या असतात. ह्या सवलती सत्ताधारी पक्षातील राजकारणी मिळवून देत असतात. त्या पदरात पाडून घेण्यासाठी उद्योगपती राजकीय पक्षांना निवडणुकीसाठी पैसा पुरवत असतात. याला कोणताच पक्ष अपवाद नाही. आजचा विरोधी पक्ष उद्या सत्ताधारी होतो; तेव्हा हेच उद्योगपती त्यांना जाऊन चिकटतात. त्यामुळे राजकारणी आणि उद्योगपती यांचे संबंध परस्पर पूरक असणे, ही खास बाब नव्हे तर सामान्य बाब झाली आहे.

## कर्जबुडव्यांना राजकारण्यांचाच आशीर्वाद



अलीकडच्या काळात अनेक उद्योगपतींनी अनेक बँकांचे हजारो कोटी रुपये बुडवून परदेशात पलायन केले. त्यामुळे भारतातील विविध बँकांना गंडा बसला. म्हणजे भारतीय नागरिकांच्या पैशांवर या पळपुट्या उद्योगपतींना डल्ला मारला. कारण बहुसंख्यवेळा सत्ताधाऱ्यांनी नियमात बसत नसतानाही नियमांची तोडफोड करून आणि कागदी घोडे नाचवून उद्योगपतींना कर्ज दिलेले असते. हा आडमार्गाने मिळवलेला अर्थपुरवठा पचला तर उत्तम. नाही पचला तर त्याच सत्ताधारी राजकारण्यांच्या मदतीने कोणालाही न माहिति होता हे उद्योगपती आपल्या लवाजम्यासह परदेशात पळून जातात. त्यानंतर सुरू होतो तो नुसत्या वेळकाढू चौकशीचा फार्स. त्यातून अनेकवेळा काहीच हाती लागत नाही. नुकसान होते ते भारतीय नागरिकांचे.

## मारुती कार व गांधी कुटुंब



स्व. इंदिरा गांधी पंतप्रधान होत्या. त्यांचे पुत्र स्व. संजय गांधी यांना स्वत:ची कार कंपनी सुरू करायची होती. सध्याची मारुती कार कंपनीची स्थापना ही संजय गांधी यांनीच केलेली. ते स्वत: मारुती कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक होते. मुलाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी इंदिरा गांधी यांनी त्यावेळी देशातील आणि देशाबाहेरील उद्योगपतींना शेअर्स घेण्यास भाग पाडले होते. त्यावरून टीकाही झाली होती. संजय गांधीचे स्वप्न पूर्णत्वाकडे निघाले होते. त्यादरम्यानच त्यांचा विमान अपघातात मृत्यू झाला. त्यानंतर मारुतीची कार बाजारात आली. अगदी काही वर्षांपूर्वीपर्यंत मारुती कंपनीमध्ये गांधी परिवाराचा हक्क होता. मात्र सांगायचा मुद्दा हा की इंदिरा गांधी यांनीसुध्दा उद्योगपतींना जवळ करूनच मुलाचे स्वप्न पूर्ण केले होते.

## पळसाला पाने तीनच




शिवसेना हा मराठी माणसांच्या हक्कासाठी स्थापन झालेला पक्ष आहे. परंतु शिवसेनेनेसुद्धा व्हिडिओकॉन उद्योगाचे सर्वेसर्वा राजकुमार धूत यांना राज्यसभेवर पाठवले. राहुल बजाज राज्यसभेवर बिनविरोध निवडून गेलेले एकमेव अपक्ष उमेदवार असावेत. त्यांना त्यावेळी सर्वच राजकीय पक्षांनी एकमुखाने पाठिंबा दिला होता. उत्तरप्रदेशच्या राजकारणात मध्यस्थ म्हणून प्रसिध्द असणारे माजी खा. अमरसिंग समाजवादी पार्टीचे माजी अध्यक्ष मुलायमसिंग यादव यांच्या जवळचे होते. उद्योगपती अनिल अंबानी व त्यांची घनिष्ठ मैत्री होती. त्यामुळेच अनिल अंबानी यांची २००३ मध्ये उत्तरप्रदेश डेव्हलपमेंट कौन्सिलच्या सल्लागारपदी नेमणूक केली होती. शिवाय त्यांना २००४ मध्ये समाजवादी पार्टीकडून राज्यसभेवरही पाठविण्यात आले होते. सध्या परदेशात पळून गेलेले विजय मल्ल्या यांना २००२ मध्ये काँग्रेसने आणि २०१० मध्ये भाजपने राज्यसभेचे खासदार बनवले होते.

## रिक्षाचालक ते उद्योगपती




पुण्यातील सध्याचे आघाडीचे उद्योगपती अविनाश भोसले हे मूळचे अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेरचे. ते जेव्हा पुण्यात आले तेव्हा रिक्षा चालवत होते. त्यांनी छोटीछोटी बांधकाम कंत्राटे घेत घेत त्यांनी १९७९ मध्ये एबीआयएल (अविनाश भोसले इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड) ग्रुपची स्थापना केली. त्यातून ते महाराष्ट्र सरकारच्या अनेक मुख्य पायाभूत प्रकल्पांच्या बांधकामातही उतरले. महामार्ग, पूल, बोगदे, तलाव आणि धरणे बांधू लागले. मात्र १९९५ मध्ये राज्यात शिवसेना-भाजप युतीचे सरकार असताना त्यांनी मोठी भरारी घेतली. कृष्णा खोरे विकास महामंडळाची असंख्य कामे त्यावेळी त्यांना मिळाली. दोन्ही काँग्रेसच्या आघाडी सरकारलाही ते युती सरकार इतकेच प्रिय होते. त्यांच्या भरभराटीला 'रॉकेट राईज' असे म्हटले जाते.



## सर्वपक्षीय प्रिय व्यक्तिमत्त्व


अविनाश भोसले यांनी पुण्यातील कोरेगाव पार्क परिसरातील हॉटेलच्या उद्घाटनाला तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख, शरद पवार, गोपीनाथ मुंडे, पतंगराव कदम आणि त्यावेळेचे देशाचे गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे जातीने हजर होते. बाळासाहेब ठाकरे महाबळेश्वरला गेल्यानंतर ते अविनाश भोसले यांच्या बंगल्यामध्ये राहत होते बाळासाहेब ठाकरे पुण्यात आल्यानंतर अनेकदा त्यांच्या गाडीचे सारथ्य अविनाश भोसले यांनीच केले आहे. काँग्रेसचे मोठे नेते विश्वजित कदम हे त्यांचे जावई आहेत. भोसले यांचा मातोश्रीपासून बारामतीपर्यंत चौफेर सगळीकडे मुक्त वावर आहे. १९९७ पासून महाराष्ट्रातील सर्वच सत्ताधाऱ्यांना हवे हवे असणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे अविनाश भोसले होय.



## हेलिकॉप्टर डिप्लोमसी

अविनाश भोसले यांच्याकडे तीन हेलिकॉप्टर आहेत. अनेक राजकीय पक्षांचे पुढारी आपल्या प्रचारासाठी भोसलेंचे हेलिकॉप्टर वापरतात. राजकारण्यांना हेलिकॉप्टर पुरवणे हा अविनाश भोसले यांचा छंद असल्याचे सांगितले जाते. उद्धव ठाकरे यांनी आषाढी वारीच्या फोटोग्राफीसाठी अविनाश भोसले यांचेच हेलिकॉप्टर वापरले होते. याचा उल्लेख उद्धव ठाकरे यांनी 'पाहावा विठ्ठल' या त्यांच्या पुस्तकामध्ये केला आहे. महाराष्ट्राशिवाय देशातील अन्य राजकारण्यांनाही भोसले यांनी हेलिकॉप्टरसेवा पुरवली आहे. अविनाश भोसलेंचे हेलिकॉप्टर न वापरले नाही असा बडा नेता महाराष्ट्राच्या राजकारणात नाही. अनेक केंद्रीय नेत्यांनीही भोसलेंच्या हेलिकॉप्टरचा उपभोग घेतला आहे.

## उद्योगपतीच्या हाती राज्याच्या राजकारणाची सूत्रे



मूळचे सांगलीचे असणारे कन्हैयालाल गिडवाणी लहान वयात सांगलीच्या गल्ली बोळात फिरून सायकलवर अडकवलेल्या पिशवीतील गोळ्या बिस्किटे विकणारे. पुढे ते साखरेच्या धंद्यातील मोठे व्यापारी झाले आणि तेच व्यापारी म्हणून राजकारणात गेले. त्याठिकाणी राज्याच्या राजकारणाची सूत्रे स्वत:च्या हाती ठेवण्याइतपत त्यांनी राजकारणात स्वत:चे प्रस्थ प्रस्थापित केले. वसंतदादा पाटील यांनी सांगलीत सहकारी साखर कारखाना उभारला. त्यावेळी बाजारपेठेत साखर व्यापाऱ्यांची मक्तेदारी होती. ती मोडून काढण्यासाठी वसंतदादांनी गिडवाणी यांना पुढे आणले. दादांनीच त्यांना मुंबईला आणले. दादा आणि शंकरराव चव्हाण यांचे संबंध बिघडल्यानंतर दादांच्या बाजूने उघडपणे फिरणारे गिडवाणीच होते. दादांचा ७० वा वाढदिवस सांगलीला धूमधडाक्यात करण्याचे नियोजन करणारेही गिडवाणीच होते. तेव्हा नागपूरला विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन होते. काँग्रेसचे मंत्री आणि आमदार यांनी सांगलीला जाऊ नये, यासाठी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी हरप्रकारे प्रयत्न केले.कन्हैयालाल गिडवाणी यांनी मुख्यमंत्र्यांच्या नाकावर टिच्चून दादा समर्थक आमदारांना खास चार्टर्ड विमानाने नागपूरवरून सांगलीला आणले आणि रातोरात परत नेऊन सोडले.

### हेगडे सरकार पाडण्याची जबाबदारी गिडवाणींवर




पुढे दादा मुख्यमंत्री झाले. या काळात विशेषत: शालिनीताई पाटलांशी कन्हैयालाल गिडवाणी यांचे सूर जुळले. कर्नाटकात रामकृष्ण हेगडे यांचे सरकार पाडायचा विडा उचलून शालिनीताई बेंगलोरला गेल्या होत्या. तेव्हा त्यांना रसद गिडवाणी यांनीच पुरवली होती.गिडवाणी तिथल्या हॉटेलमध्ये पैशांच्या बॅगेसह पोलिसांना सापडले होते. पण या सर्व प्रकरणातून गिडवाणी सहीसलामत बाहेर पडले.

### राष्ट्रीय राजकारणातही प्रवेश



वसंतदादांच्या मृत्यूनंतर त्यांनी राष्ट्रीय राजकारणात जनता दलाची साथ पकडली.नासिकराव तिरपुडे यांच्यासारख्या नेत्याला काँग्रेसमधून जनता पक्षात नेण्यात त्यांचाच हात होता. लवकरच पंतप्रधान व्ही.पी. सिंग यांच्या निकटवर्तीयांसोबत ते दिसू लागले. व्ही.पी. सिंग यांचं सरकार पडल्यावर चंद्रशेखर यांच्या पक्षात गेले. पडद्याआड राहून प्यादे हलवणे यात त्यांनी स्पेशलायजेशन मिळवले.

### युती सरकारच्या निर्मितीत गिडवाणींची करामत



सन १९९५ च्या विधानसभा निवडणुकांचे निकाल आले. एका बाजूला मुख्यमंत्री शरद पवारांना म्हणजे काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. दुसऱ्या बाजूला शिवसेना- भाजपलाही सत्ता स्थापन करण्यासाठी संख्याबळ कमी पडत होते. तेव्हा बाळासाहेब ठाकरे यांनी गिडवाणींचा पत्ता बाहेर काढला. गिडवाणी यांनीही त्यांचे कौशल्य पणाला लावून अपक्ष आमदारांना शिवसेनेच्या पाठीशी उभे केले. सत्तेवर आलेल्या युती सरकारच्या निर्मितीत गिडवाणी किंगमेकर ठरले होते. म्हणून बाळासाहेबांनी त्यांना शिवसेनेत घेऊन विधानपरिषदेवर आमदार केले. त्यावेळी विधानसभेत लातूरमधून पराभूत झालेले विलासराव देशमुख यांना शिवसेनेत आणण्याची जबाबदारीसुध्दा गिडवाणी यांनीच पार पाडली होती.

### ठाकरे कुटुंबीय आणि धूत



औरंगाबादमधून येणाऱ्या नंदलाल धूत यांनी व्हिडिओकॉनची स्थापना केली. तेव्हापासूनच ठाकरे कुटुंबीय आणि धूत कुटुंबीय यांचे जवळचे संबंध असल्याचं सांगितलं जात. वेणूगोपाल धूत यांचा औरंगाबाद इथे एक प्रशस्त बंगला आहे. या बंगल्याचा अनेक राजकारणी, उद्योगपती वापर करत असतात. याच बंगल्यात औरंगाबादला आल्यानंतर बाळासाहेब ठाकरेही यायचे. वेणूगोपाल धूत यांचे भाऊ आणि व्हिडिओकॉनचे सहमालक राजकुमार धूत हे शिवसेनेकडून तीन वेळा राज्यसभेचे खासदार होते. २०१५-१६ मध्ये शिवसेनेला मिळालेल्या एकूण ८६.८४ कोटी रुपयांच्या देणग्यांपैकी एकट्या व्हिडिओकॉनने ८५ कोटी रुपयांची देणगी दिली होती. निवडणूक आयोगाला दिलेल्या माहितीवरून ही गोष्ट स्पष्ट झाली.

### भाजी विक्रेता ते उद्योजक आणि उद्योजक ते खासदार



महाराष्ट्राच्या राजकारणात अल्पावधीत लोकप्रिय झालेला चेहरा म्हणजे संजय काकडे. संजय काकडे २०१४ मध्ये राज्यसभेवर बिनविरोध खासदार झाले. राज्यसभेच्या इतिहासात नोंद झालेली ही घटना आहे. कोणत्याही पक्षाचा सदस्य नसलेली आणि राजकीय पार्श्वभूमी नसलेली व्यक्ती बिनविरोध निवडून जाण्याची ती पहिलीच वेळ होती. राज्यसभेवर गेल्यानंतर भाजपचे ज्येष्ठ नेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या आवाहनानंतर संजय काकडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्षाच्या सरकारला बिनशर्त पाठिंबा दिला. ते भाजपाचे सहयोगी सदस्य देखील झाले. घोरपडी पेठेत हालाखीच्या परिस्थितीत माजी खासदार काकडे यांचे बालपण गेले. एका शिक्षकाच्या घरात जन्म घेतलेल्या संजय काकडे यांनी १९८६ मध्ये बांधकाम व्यवसायात पाऊल टाकले आणि 'संजय काकडे ग्रुप'ची मुहूर्तमेढ रोवली गेली. रिअल इस्टेट व इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रात काम करणारा विश्वसनीय ब्रँड म्हणून आज 'संजय काकडे ग्रुप'ची ओळख आहे. येणाऱ्या नजीकच्या काळात भूगाव येथे १५० एकरमध्ये टाऊनशीप, कोंढवा परिसरात २५० एकरामध्ये टाऊनशीप, कोथरुडला २५ एकरमध्ये काकडे सिटी, बाणेर रस्त्यावर कमर्शिअल प्रोजेक्ट, कोरेगाव पार्कमध्ये पंचतारांकित हॉटेल इत्यादी अनेक प्रकल्प होत आहेत.


संकलन व संपादन : राजकुमार नरुटे | मांडणी व सजावट : अभिषेक उघडे

# पांडुरंग साखर कारखान्यात तोडणी वाहतूक कराराचा शुभारंभ

सुराज्य/श्रीपूर

**श्रीपूर (ता. माळशिरस) येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यामध्ये गळीत हंगाम २०२३-२४ साठीच्या तोडणी वाहतूक ठेकेदारांच्या कराराचा शुभारंभ शनिवारी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर सुरू करण्यात आले. यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन कैलास खुळे, ज्येष्ठ संचालक दिनकरराव मोरे, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी उपस्थित होते.**



सन २०२२-२३ गळीत हंगामामध्ये ऊस वाहतूक करून चांगला धंदा करणारे ऊस तोडणी वाहतूकदार जाधव संतोष श्रीरंग बोहाळी, निळे रावसाहेब शंकर शिरढोण, बनसोडे विठ्ठल भारकर चळे, कौलगे संताजी बाळकृष्ण पिराची कुरोली, पवार महादेव साहेबराव खेड भोसे, नरसाळे सोमनाथ नागनाथ जळोली, पाटील अनिल अण्णासो जांभू ॲड. जगताप वैभव प्रल्हाद कंदर, कुलकर्णी राहुल रत्नाकर बेंबळे, सुळ आबा जयंत काळमवाडी, कोळी हनुमंत बबन नरसिंहपूर या सर्व ऊस तोडणी वाहतूकदारांचा कारखान्याचे व्हाईस चेअरमन कैलास खुळे, ज्येष्ठ संचालक दिनकर मोरे, कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी, केन मॅनेजर संतोष कुमठेकर, ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर या सर्वांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. कारखान्याने शनिवारपासून करार सुरू केले असून पुढील आठ ते दहा दिवसात संपूर्ण करार करण्यात येणार आहेत

यावेळी बोलताना डॉ. यशवंत कुलकर्णी म्हणाले की 'साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या अक्षय तृतीयेच्या दिवशी कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने गळीत हंगाम २०२३-२४ साठी आवश्यक असणाऱ्या तोडणी वाहतूक ठेकेदारांच्या कराराचा शुभारंभ केला असून यावेळी तोडणी वाहतूक ठेकेदारांचे करार हे शासनाने तयार करून दिलेल्या मसुद्यानुसार होणार असून कारखान्याकडे येणाऱ्या तोडणी वाहतूक ठेकेदारांचे करार लवकरात लवकर संपवून त्यांना प्रथम ॲडव्हॉन्स हप्त्याची रक्कम ही वेळेत दिली जाणार असल्याची माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी दिली.

यावेळी कारखान्याकडे करार करणारे तोडणी वाहतूक ठेकेदार, केन मॅनेजर संतोष कुमठेकर व ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर व इतर अधिकारी उपस्थित होते.

## हंगाम नऊ हजार गाळप मे. टन. क्षमतेने चालणार : परिचारक

पुढील गणित हंगामात कारखाना प्र. मे टन नऊ हजार गाळप क्षमतेने चालणार असल्याने यावर्षी कारखान्यास जास्तीची यंत्रणा भरावी लागणार आहे त्या दृष्टीने कारखान्याचे करार सुरू केला आहे. जास्तीत जास्त चांगली तोडणी वाहतूक यंत्रणा कारखान्याकडे उपलब्ध व्हावी यासाठी कारखान्याचे व्यवस्थापन प्रयत्न करणार आहे. कार्यक्षेत्रातील बरेच तोडणी वाहतूक ठेकेदार करार करण्यास इच्छुक असून कारखान्याने गळीत हंगाम २०२२-२३ मधील तोडणी वाहतूक ठेकेदाराची बिले वेळेवर अदा केली आहेत. त्याचप्रमाणे कमिशन डिपॉझिटची रक्कम ही लवकरच अदा करणार आहोत, अशी माहिती कारखान्याची चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी दिली.



## इंडियन ऑलिम्पियाड स्पर्धेत आर्या पब्लिक स्कूलचे यश

**सुराज्य/माढा :** आर्या पब्लिक स्कूल माढा येथील विद्यार्थ्यांनी इंडियन टॅलेट ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेत उत्तुंग यश मिळवले असून यामध्ये आर्यन लक्ष्मण राऊत याने ९ वी सायन्स ऑलिम्पियाडमध्ये राज्यात तृतीय क्रमांक तर अभिनव सचिन चवरे याने राज्यात ७ वा क्रमांक मिळवीत शिष्यवृत्तीधारक बनले आहेत. याचबरोबर विवेक प्रशांत शिंदे, शौर्य नवनाथ तांबिले, प्रेरणा औदुंबर राऊत, गिरीराज जोतीराम काटे आदि विद्यार्थ्यांनी उत्तम गुणांकन प्राप्त गुणवंत विद्यार्थी म्हणून यश मिळवले आहे. डिसेंबर २०२२ मध्ये ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेचा पहिला टप्पा झाला होता. यामध्ये उच्च गुणांकन प्राप्त विद्यार्थी फेब्रुवारी २०२३ मध्ये झालेल्या दुसऱ्या टप्प्यातील परीक्षेस पात्र झाले होते. या उच्चस्तरीय परीक्षाचा निकाल नुकताच लागला असून यामध्ये आर्या पब्लिक स्कूलमधील दोन विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक तर इतर ४ विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन केले आहे. या विद्यार्थ्यांना प्रा. सागर थोरात, दत्तात्रय चव्हाण, मनोज नागटिळक, उबाळे, राम माळी, वंदना गोसावी आदिंचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थापक तथा आमदार बबनराव शिंदे, जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे, व्यवस्थापन समिती अध्यक्षा प्रणिता शिंदे, प्राचार्य सागर थोरात आदिंनी केले आहे.

# रमजान सणानिमित्त सामुदायिक नमाज पठण

सुराज्य/पिलीव

**इस्लाम धर्मातील पवित्र मानलेल्या पिलीवमध्ये रमजानच्या ३० दिवसाच्या उपवासाची सांगता पिलीव येथील ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज अदा करून सांगता समारंभ करण्यात आला.**



माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील पारंपारिक अशा ईदगाह मैदानावर परंपरेप्रमाणे जामा मशीद वक्फ संस्थेच्या पुढाकाराने उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन नेहमीच्या वेळेत बदल करून स. ८ वाजता सामूहिक नमाज पठनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मुस्लीम बांधवांना मौलाना मुजमिल तांबोळी यांनी नमाजीचे महत्त्व पटवून सांगितले. यावेळी जारमे मशीद वक्फ संस्थेचे मार्गदर्शक सचिव ज्येष्ठ नागरिक नजीर मुलांणी संस्थेचे अध्यक्ष महिबूब मुलाणी यांनी नमाजीचे नियोजन केले होते.तसेच यावेळी सामुदायिक नमाज यशस्वीपणे पार पाडण्यासाठी माजी उपसरपंच आरिफखान पठाण, सलीम मुलाणी, जाफर मुलांणी, अल्ताफ मुलाणी, मुबारक मुलाणी, अमीनखान पठाण, अरमान शेख, सोहेल काजी, सोहेल बागवान, वाहीद सय्यद, साजिद शेख, अमीर शेख, समीनखान पठाण, रियाज तांबोळी, शाबीर सय्यद यांनी परिश्रम घेतले. तसेच तिन्ही मशिदीतील मुस्लीम युवकांनी व समाज बांधवांनी एकत्रितपणे परिश्रम घेतले.

यावेळी पिलीव माळशिरस पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, पोलीस उपनिरीक्षक एम. एम. पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार राहुल वाघ व पंडित मिसाळ दोन होमगार्ड तसेच पठाण वस्ती येथे हवलदार अभिजीत कणसे व अमित जाधव व दोन होमगार्ड तसेच चांदापुरी (पठाणवस्ती) येथे हवालदार सतीश धुमाळ व दत्तात्रय खरात यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



## प्रत्येक गावात सूरज जाधवसारखे विद्यार्थी तयार व्हावेत : स्वामी

सुराज्य/वेळापूर

'प्रत्येक गावात लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून सुरज जाधवसारखे विद्यार्थी तयार व्हावेत यासाठी शिक्षण क्षेत्रात मोठे प्रयत्न सुरू असल्याचे प्रतिपादन जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले. ते मळोली (ता. माळशिरस) येथील जनता विद्यालयात सेवानिवृत्त शिक्षक अनंता बाबासाहेब जाधव यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त त्यांचे चिरंजीव भारतीय दूतावास भारत सरकार चान्सरी प्रमुख सुरज जाधव यांच्यावतीने सुरू केलेल्या स्वामी विवेकानंद ग्रंथालय व अभ्यासिका केंद्राच्या उद्घाटन समारंभाच्या कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी दिलीप स्वामी, सेवानिवृत्त शिक्षक अनंता जाधव, बिडिओ माळशिरस विनायक गुळवे, पंचायत समितीचे, सदस्य रणजितसिंह जाधव, कै. रमेश बनकर फाउंडेशनच्या अध्यक्षा साधना बनकर, उद्योगपती मोहित जाधव, जनता विद्यालयाचे मुख्याध्यापक बी. आर. जाधव आदी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी मळोली गावचे उपसरपंच ॲड. महादेवनाना पवार हे होते. स्वामी विवेकानंद ग्रथालय व अभ्यासिकाचे उद्घाटन दिलीप स्वामी, पं. स. सदस्य व रणजीतसिंह जाधव, सुरज जाधव, अनंता जाधव गुरुजी यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविक पृथ्वीराज जाधव यांनी केले. कार्यक्रमाला माजी सरपंच गणेश पाटील, सुरेश जाधव, शब्बीर मुजावर, बीएसएनएलचे शंकर कदम, पोपटनाना काळे, संजय गुजर, विकास जाधव, माजी मुख्याध्यापक एस. टी. जाधव, ग्रामविकास अधिकारी एस. जी. उरवणे, पर्यवेक्षक तानाजी लवटे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन अभिजीत जाधव यांनी केले.

## झरे फाट्याजवळ शिवशाही बस व मोटारसायकलचा अपघात

सुराज्य/सोलापूर

टेंभुर्णी-करमाळा मार्गावर झरे फाट्याजवळ शिवशाही एसटी बस व मोटारसायकलचा अपघात झाला. या अपघातात दुचाकिस्वार जखमी झाला आहे. हयगयीने वाहन चालवून अपघाताला कारणीभूत झाल्याप्रकरणी करमाळा पोलिसांनी मोटार सायकलचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

करमाळा-टेंभुर्णी मार्गावर २० एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. अपघातातील दुचाकिस्वाराचे नाव समजू शकलेले नाही. शिवशाही एसटी बस सोलापूरहून धुळ्याला जात होती. ती झरे फाटा येथे येताच करमाळ्याहून जेऊरकडे जाणाऱ्या एका मोटारसायकलने साईटपट्टीवरून येऊन जोरात धडक दिली. त्यात एसटीचे नुकसान झाले आहे. मोटारसायकल स्वार देखील जखमी झाला. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी एसटी बस चालक बाळू ज्ञानदेव वायभासे (वय ४८, रा. माधवबाग, भिंगार, नगर) यांनी फिर्याद दिली आहे.

## ठाकरे गटाच्यावतीने शिवजयंती साजरी



सुराज्य/पिलीव : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने शनिवारी माजी जिल्हा उपप्रमुख अशोक घोंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली साजरी करणयात आली.

गेल्या ३७ वर्षांपासून अखंडीतपणे ही शिवजयंती साजरी करण्यात येते. प्रथम अशोक घोंगडे यांच्या हस्ते छ. शिवाजी महाराज व हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजप करण्यात आले. यावेळी युवा सेनेचे डॉ. निलेश कांबळे, पडळक, कुमार भैस, दामोदर लोखंडे, विजय पिसे, श्याम लेंगरे, संतोष जामदार, संजय रोकडे, विकास पाटील, संभाजी लोखंडे, शहाजी वाघ, संजय पाटील उपस्थित होते.



## पोलीस उपमहानिरीक्षक दिवाण यांनी घेतले श्री स्वामी समर्थांचे दर्शन

**सुराज्य/अक्कलकोट :** कोल्हापूरचे पोलीस उपमहानिरीक्षक संदीप दिवाण यांनी नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी संदीप दिवाण व कुटुंबियांचा सन्मान केला. याप्रसंगी अक्कलकोट नॉर्थ पोलीस ठाण्याचे पी. आय. जितेंद्र कोळी, सी. आय. डी. मजीद सय्यद साहेब, नन्नू कोरबू, भैय्या नाईकवाडी, असिफ नाईकवाडी, शुभम विभूते, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, श्रीशैल गवंडी, प्रसाद सोनार, संजय पवार, श्रीकांत मलवे, ऋषिकेश लोणारी आदींसह स्वामी भक्त उपस्थित होते.

## अकलूज येथे पवित्र रमजान सण उत्साहात साजरी

सुराज्य/अकलूज

अकलूज येथील नीरा नदीच्या काठी असलेल्या भव्य ईदगाह मैदानावर अकलूज आणि परिसरातील मुस्लीम बांधवांनी रमजान ईदची नमाज अदा केली रमजान महिन्याच्या संपूर्ण महिनाभर केलेल्या रोजा (उपवास) नंतर ३१ व्या दिवशी म्हणजेच शव्वालच्या एक तारखेला रमजान ईद साजरी केली जाते. या रमजान ईदनिमित्त ईदगाह मैदानावर ईदची नमाज आणि खुतबा दर्गा मशिदीचे इमाम मौलाना जाकिर हुसेन साहब यांनी पठण करुन प्रवचन केले. यावेळी मार्गदर्शन करताना म्हणाले की, 'संपूर्ण रमजान महिन्याच्या रोजानंतर त्याचा मोबदला अल्लाहकडून मागण्यासाठी ईदची नमाज अदा केली जाते आणि या दिवशी अल्लाह आपल्या लेकरांना जे मागेल ते देऊ करते अशी आख्यायिका आहे.

या रमजान ईदनिमित्त मुस्लीम बांधवांना शुभेच्छा देण्यासाठी विधान परिषदेचे आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील, अकलूज उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे, अकलूजचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील, किशोर सिंह माने-पाटील, अकलूज नगर परिषदेचे मुख्य अधिकारी-दयानंद गोरे, अकलूज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीप रतन गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. ईदच्या नमाजनंतर मुस्लीम बांधव एकमेकांना आलिंगन देऊन शुभेच्छा दिल्या. तसेच जागोजागी हिंदू बांधवही मुस्लीम बांधवांना शुभेच्छा दिल्या तसेच सर्वांनी याप्रसंगी ईदच्या शिरखुर्म्याचा आस्वाद घेतला रमजान ईदनिमित्त अकलूज नगर परिषदेचे मुख्याधिकारी आणि त्यांच्या कर्मचारी तसेच अकलूज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपरतन गायकवाड यांचे विशेष सहकार्य लाभले.

# स्मारक करणे हीच म. बसवेश्वरांना खरी आदरांजली ठरेल : पटणे

## महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

सुराज्य/मंगळवेढा

**'महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा महात्मा बसवेश्वरांची कर्मभूमी असून मंगळवेढा येथे लवकरात लवकर महात्मा बसवेश्वरांचे स्मारक होणे गरजेचे असून हीच खरी महात्मा बसवेश्वरांना आदरांजली ठरेल', असे मत देगलूर बिलवली मतदार संघाचे माजी आमदार गंगाधर पटणे यांनी केले.**

शनिवार दि. २२ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता मारुती पटांगण येथे महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त आयोजित प्रसाद वाटप कार्यक्रमप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी जकराया शुगर्सचे कार्यकारी संचालक सचिन जाधव, डॉ. प्रिती शिर्के, माजी नगरसेवक अजित जगताप, प्रविण खवतोडे, उद्योजक अभिजीत लोखंडे, मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग नकाते, उपाध्यक्ष महेश वठारे, मनोज माळी, रमेश राजमाने, विजय बुरकूल, संतोष मोगले, दिगंबर माळी, सखाराम माळी, अशोक माळी,दादा स्वामी, पांडुरंग मेहरकर, गौरीशंकर राजमाने, अविनाश शिंदे, सोमनाथ माळी, सोमनाथ वठारे तसेच मंडळाचे सदस्य उपस्थित होते.



जकराया शुगर्सचे कार्यकारी संचालक सचिन जाधव म्हणाले, 'कर्माचे श्रेष्ठ बसवेश्वरांनी पटवून दिले. आपल्या ज्ञानप्राप्तीतून त्यांनी अनेक ग्रंथांचे लेखन केले. केवळ शिवाचीच उपासना करावी, असे आपले ठाम मतही मांडले. 'काय कवे कैलास' हा विचार त्यांनी मांडला. धार्मिक अंधश्रद्धेच्या विळख्यात सापडलेल्या समाजाला आपल्या उपदेशातून संजीवनी देण्याचे कार्य महात्मा बसवेश्वरांनी केलेले आहे. बसवण्णांचे सर्व विचार हे समतेचा संदेश देणारे आहेत तरी सर्वांनी विचार आचरणात आणणे गरजेचे आहे. श्री म. बसवेश्वर मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळ मंगळवेढा यांच्यावतीने शुक्रवार २१ व २२ रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. म. बसवेश्वर जयंतीनिमित्त दि. २२ रोजी. दुपारी ४ वाजता भक्तिमय वातावरणात शहरातून मिरवणूक काढण्यात आली.

प्रारंभी महात्मा बसवेश्वरांच्या मूर्तीचे पूजन जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक बबनराव आवताडे व विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन भगीरथ भालके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग नकाते, ॲड. श्रीशैल्य हावनाळे, गौरीशंकर बुरकुल, संतोष मोगले, विजय बुरकुल, अशोक माळी, अर्जुन देवकर, राजमाने साहेब, बलवान वाकडे, प्रकाश स्वामी आदी उपस्थित होते.



## नागनाथ अर्जुन यांचा गरुड बंगला येथे सत्कार

सुराज्य/वेळापूर : कन्हेर ग्रामपंचायतच्या प्रभारी सरपंचपदी मंगलताई अर्जुन यांची नियुक्ती झाल्याबद्दल, त्यांचे चिरंजीव नवनाथ अर्जुन यांचा वेळापूर गरुड बंगला येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उत्तमराव जानकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास माळशिरस पंचायत समितीचे माजी सभापती मच्छिंद्र आबा ठवरे, राष्ट्रवादी नेते रमेश भाऊ पाटील, धानोरे गावचे माजी सरपंच जीवन जानकर, भाऊसाहेब जानकर आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर
Classified
विवाहविषयक
वधु २६, ५.३, गोरी, १० वी, हिंदु लिंगायत, वडील नाहीत. आई-मुलीचा केटरींग व्यवसाय, शेती ४ एकर, मुलीकरीता सर्वजातीय सामान्य वर चालेल.
मो.7028536999
8446068427
(240423)

# स्वेरीच्या विद्यार्थ्यांचा कर्नाटकातही झेंडा

## बीदरमधील 'गुरु फेस्ट २०२३' स्पर्धेत विद्यार्थ्यांची बाजी

सुराज्य/पंढरपूर

कर्नाटक राज्यात आयोजिलेल्या प्रकल्प स्पर्धेमध्ये स्वेरी इंजिनिअरींगच्या तब्बल ३६ विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय दर्जा असलेल्या 'गुरु फेस्ट २०२३' या स्पर्धेत भरघोस बक्षिसे मिळविली. त्यामुळे स्वेरीने राज्याबरोबरच आता राज्याबाहेर देखील आपला झेंडा फडकवला आसहे.

स्वेरीचे संस्थापक सचिव व इंजिनिअरींग कॉलेजचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक अधिष्ठाता व सिव्हील इंजिनिअरींगचे विभागप्रमुख डॉ. प्रशांत पवार यांच्या नेतृत्वाखाली व डॉ. माणिक देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बिदर (कर्नाटक) मधील गुरुनानक देव इंजिनिअरींग कॉलेज मध्ये झालेल्या 'गुरु फेस्ट २०२३' स्पर्धेत विविध विभागात यश मिळविले. रांगोळी विभागात प्रथम क्रमांक, टग ऑफ वार आणि प्रश्नमंजुषा या दोन्ही स्पर्धेत दुसरा क्रमांक असे विविध पारितोषक मिळविले. या स्पर्धेमध्ये स्वेरी इंजिनिअरींगचे श्रद्धा महेश गोरे, ज्ञानेश्वरी नागनाथ गोसावी, श्रुती शशिकांत जाधव, स्नेहल शंकर अंबुरे, रोहिणी बबन भंगरे, अंजुम अन्वरशाह मकानदार, सनुष सुरेंद्र भाटकर, क्षितीजा विकास चव्हाण यांच्यासह 'इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग' आणि सिव्हील इंजिनिअरिंग' विभागातील तब्बल ३६ विद्यार्थ्यांनी या स्पर्धे चमक दाखवली. गुरुनानक देव इंजिनिअरींग कॉलेज संस्थेचे चेअरमन सरदार बलबीर सिंग आणि संस्थेच्या व्हाईस चेअरपर्सन रेश्मा कौर यांच्या हस्ते या स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आले. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख आदींनी सर्वांचे अभिनंदन केले.





# गोदावरीच्या काठी लाखो मासे मृतावस्थेत

**घाटात दुर्गंधी, मुख्यमंत्र्यांकडे तक्रार**

✔ सुराज्य/नांदेड

**नांदेडमध्ये गोदावरी नदीच्या पात्रात लाखोच्या संख्येने मासे मृतावस्थेत आढळल्याने एकच खळबळ उडाली आली आहे. गोवर्धन घाट, नगीना घाट, बंदा घाट या नदी घाटांवर मृत माशांचा खच आढळून आला आहे. या मृत माशांमुळे नदी घाट परिसरात मोठी दुर्गंधी देखील पसरली आहे.**

हे मृत मासे आले कुठून आणि त्यांचा मृत्यू नेमका कुठल्या कारणामुळे झाला, हे मात्र अद्यापही अस्पष्टच आहे. दरम्यान हा प्रकार सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर शनिवारी महापालिका प्रशासनाला जाग आली आणि त्यांनी तात्काळ गोदावरी नदीतील मृत मासे काढण्याचे काम सुरु केले. पण अद्यापही प्रदूषण विभागाच्या अधिकाऱ्यांनी याची कुठलीच दखल घेतली नसल्याची माहिती आहे.

मृत माशांचा खच आढळल्याचा प्रकार उघडकीस येऊन अनेक तास उलटले असले तरी प्रदूषण विभागाचा एकही अधिकारी घटनास्थळी पोहचला नाही. दरम्यान यापूर्वी देखील अशाच प्रकारे मृत माशांचा खच आढळला होता. अशाप्रकारे घटना घडत असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.


शहरातील १८ नाल्यांचे घाण पाणी गोदावरी नदीत मिसळत आहे. गोदावरी नदी दूषित झाली आहे. या घाण पाण्यामुळेच लाखो माशांचा मृत्यू झाला आहे, असा अंदाज जल अभ्यासक तथा सायन्स महाविद्यालयाचे मत्स्यशास्त्र व प्राणी शास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. किरण शिल्लेवार यांनी व्यक्त केला आहे.

या घटनेला महापालिका जबाबदार असून आयुक्तांसह संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी शिलेवार यांनी केली आहे. दरम्यान या प्रकारानंतर शिलेवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार देखील केली आहे.

## ग्रामीण रुग्णालयात तोडफोड; डॉक्टर, कर्मचाऱ्यांना शिवीगाळ

✔ सुराज्य/धाराशिव

**आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्या मतदार संघातील भूम ग्रामीण रुग्णालयाची गुरुवारी रात्री अज्ञात व्यक्तीने तोडफोड केली. याबरोबरच कर्तव्यावर उपस्थित असणारे डॉक्टर व कर्मचाऱ्यांना देखील शिवीगाळ करण्यात आल्याचे समजतंय. एवढा राडा झाला असताना संबधित व्यक्तींच्या विरोधात अदयाप गुन्हा दाखल झाले नाही. यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.**



भूम शहरातील एका रुग्णाला उपचारासाठी गुरुवारी रात्री भूम ग्रामीण रुग्णालयात दाखल केले होते. किरकोळ कारणावरुन रुग्णाच्या नातलगाने ड्युटीवर असणारे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर होनमाने, ब्रदर खैरे, सफाई कर्मचारी कांबळे यांच्याशी हुज्जत घालून त्यांना शिवीगाळ करून दवाखान्यातील सर्व औषधे अक्षरश: जमिनीवर फेकून दिली. तसेच तिथल्या खुर्च्यांची व कचरा ठेवणाऱ्या डस्टबिनची पण तोडफोड करण्यात आली. या हल्ल्यात समोरून असलेल्या केबिनची काच फोडून टाकण्यात आली. ड्युटीवर असणारे ब्रदर खैरे यांना पण शिवीगाळ करण्यात आली. हा सर्व प्रकार ग्रामीण रुग्णालयात सुरू असताना पोलिसांना साधी कल्पनाही देण्यात आलेली नाही.

हा सर्व प्रकार घडल्यानंतर या प्रकाराचे व्हिडिओ व्हायरल झालेले आहेत. त्यात स्पष्टपणे तोडफोड केल्याचे दिसत आहे. संबंधित प्रकाराचे व्हिडिओ जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. गलांडे यांना पाठविण्यात आलेले होते. तरीही यावर कारवाई झालेली अद्यापही दिसत नाही.



## मेधा कुलकर्णी लोकसभेसाठी उत्सुक

✔ पुणे : पुण्याचे भाजप खासदार गिरीश बापट यांच्या निधनानंतर पुणे लोकसभेची जागा रिक्त झाली आहे. यामुळे पुणे लोकसभा पोटनिवडणूक लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. ही पोटनिवडणूक लढवण्यासाठी भाजपसह काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांनी तयारी सुरु केल्याचं चित्र सध्या पुण्यात पाहायला मिळत आहे. भाजपचे शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांचे कल्याणीनगर भागात भावी खासदार म्हणून बॅनर लागले होते. तर राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांचे देखील राष्ट्रवादी भवनसमोरच भावी खासदार म्हणून बॅनर लागले होते. इतकंच काय तर अजित पवार यांनी देखील जगतापांना खासदारकीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## रात्रीची ड्युटी ठरली जीवघेणी

## भीषण अपघातात पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू

✔ छत्रपती संभाजीनगर

पोलीस वाहन घेऊन रात्रपाळीची ड्युटी करत असताना वाहनासमोर हरीण आल्याने वाहन थेट झाडावर जाऊन धडकलं. या अपघातात एका पोलीस कर्मचाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना शनिवारी पहाटे तीन वाजेच्या सुमारास लोणी ते शिऊर बंगला रोडवर लोणीकडून शिऊर बंगल्याकडे येत असताना राधाकृष्ण मंगल कार्यालयासमोर घडली. या घटनेमुळे पोलीस कर्मचाऱ्याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



या प्रकरणी अधिक माहिती अशी की, पोलीस हेडकॉन्स्टेबल विठ्ठल एकनाथ भदाणे (वय ४८ रा. हडको कॉर्नर, ३ वानखेडे नगर) आणि पोलीस कॉन्स्टेबल सिध्देश्वर इधाटे (वय २२, रा. छत्रपती संभाजीनगर) हे दोघे शिऊर पोलीस ठाण्यात कार्यरत आहे. शुक्रवारी दोघांची रात्रपाळीची ड्युटी सुरू होती. यामुळे दरोडा प्रतिबंधक पेट्रोलिंग करण्यासाठी रात्री ११ वाजता दोघे पोलिसांचे वाहन असलेली चारचाकी घेऊन गस्तीवर होते.

दरम्यान, पहाटे तीन वाजेच्या सुमारास लोणी ते शिऊर बंगला रोडवर लोणीकडून शिऊर बंगल्याकडे येत असताना राधाकृष्ण मंगल कार्यालयासमोर त्यांच्या वाहनासमोर हरीण आल्याने चारचाकी झाडाला धडकली. या अपघातात चालक सिध्देश्वर इधाटे यांच्या हाताला लागल्यामुळे त्यांच्यावर खासगी दवाखान्यात उपचार सुरू आहेत. तर विठ्ठल भदाणे हे गंभीर जखमी झाले. त्यांना बेशुद्ध अवस्थेत तात्काळ घाटी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी शिऊर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.


## काँग्रेस आमदार खोसकर यांना जीवे मारण्याची धमकी

✔ **नाशिक** : नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूक प्रचारावरून भाजप-शिवसेना शिंदे गटाच्या शेतकरी विकास पॅनलचे नेते शिवाजी चुंभळे यांनी थेट महाविकास आघाडीचे आमदार हिरामण खोसकर यांना फोनवरून धमकी दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तालुका पोलिस ठाण्यात शिवाजी चुंभळे यांच्यासह त्यांचे चिरंजीव अजिंक्य चुंभळे यांच्यावर अदखल गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## महागड्या मिरचीमुळे ग्राहकांना ठसका

✔ **पुणे** : उन्हाचा ताप दिवसेंदिवस वाढत असला, तरी घरगुती मसाला तयार करण्याचा हाच हंगाम असतो. यंदा मात्र तापमापकातील पाऱ्याप्रमाणे लाल मिरचीचा भाव वाढला असून, ग्राहकांना भाववाढीमुळे ठसका बसत आहे. अवेळी आलेला पाऊस, काही ठिकाणी पिकावर आलेली कीड यामुळे यंदा मिरचीचे उत्पादन यंदा कमी झाले. तेलंगणा, कर्नाटक, आंध्रप्रदेश येथून प्रामुख्याने राज्यात मिरचीची आयात केली जाते. यावर्षी हे प्रमाण पंधरा ते वीस टक्क्यांनी घसरल्याचे व्यापारी सांगतात. कोरोना संसर्गाच्या काळामध्ये निर्बंधामुळे घरगुती मसाला करण्याचे प्रमाण कमी झाले होते. यंदा मात्र त्यात चांगलाच उठाव आहे. मागणी वाढली, तरीही हवी तितकी उपलब्धता नसल्याने मसाल्याच्या एकूण दरांनाही महागाईची झळ बसणार आहे.



## भीषण अपघातात सात जणांचा मृत्यू, ४० जण जखमी

✔ **अयोध्या** : उत्तरप्रदेशच्या अयोध्येतील लखनौ-गोरखपूर महामार्गावर खासगी बसने ट्रकला धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात सात जणांना दुर्दैवी मृत्यू झाला असून ४० जण गंभीर जखमी झाली आहे. शुक्रवारी रात्री उशीरा ही घटना घडली. दरम्यान, या घटनेनंतर जखमींना तत्काळ जवळच्या सरकारी रुग्णालायात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. एएनआयने दिलेल्या वृत्तानुसार, शुक्रवारी रात्री अयोध्येकडून येणाऱ्या खासगी बसने आंबेडकरनगरकडे जाण्यासाठी लखनौ-गोरखपूर महामार्गावरून वळण घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने ही बस थेट विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रकला जाऊन भिडली. हा अपघात इतका भीषण होता की, बसमधील काही प्रवाशी बाहेर फेकल्या गेले, त्यातील काही जण ट्रकखाली दबले.

## महेंद्रसिंग धोनीची क्रिकेटमधून निवृत्ती

✔ **नवी दिल्ली** : चेन्नई सुपरकिंग्सचा कर्णधार महेंद्र सिंह धोनीच्या कॅप्टन्सीमध्ये संघाने शुक्रवारी सनरायजर्स हैदराबादविरुद्ध विजय मिळवला. यावेळी सामन्यानंतर धोनी हर्षा भोगले यांच्याशी चर्चा करताना दिसला. त्यावेळी धोनीच्या एका वाक्याने अनेक चाहत्यांना धक्का बसला.



धोनीने आयपीएलमधून संन्यास घेण्याचा इशारा दिला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून आधीच संन्यास घेतलेला धोनी वर्षातून दोन महिने केवळ आयपीएल खेळताना दिसतो. पण आता लवकरच तो या टूर्नामेंटमधूनही बाहेर पडणार असल्याचे संकेत दिले आहेत. आयपीएलच्या १६व्या सीजनमध्ये गुरुवारी रात्री सनरायजर्स हैदराबादविरुद्धचा सामना जिंकल्यानंतर त्याने हा माझ्या करिअरमधील शेवटचा टप्पा असल्याचं म्हटलं आहे. चेन्नईतील प्रसिद्ध चेपॉक स्टेडियममध्ये सामना संपल्यानंतर हर्षा भोगले यांच्याशी धोनीने त्यांच्या भविष्याबाबत चर्चा केली. ४१ वर्षीय धोनीने यावेळी बोलताना सांगितलं की, 'सगळं काही बोलून आणि करुन झालं आहे. मी कितीही खेळलो, तरी हा माझ्या करिअरचा शेवटचा टप्पा आहे.' एमएस धोनीने त्याला चाहत्यांकडून मिळालेल्या प्रचंड पाठिंब्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत. यावेळी बोलताना धोनीने यंदाचा आयपीएल सीजन मागील दोन सीजनहून अतिशय वेगळा असल्याचंही म्हटलं.

## ...तर शिक्षण संस्था चालकास होणार एक लाखाचा दंड

✔ सुराज्य/पुणे : वर्धा : शासनाची मान्यता नसतांनाही खासगी शाळा राज्यात चालवल्या जात असल्याने शिक्षण विभाग सतर्क झाला आहे. शैक्षणिक सत्र सुरू होण्यापूर्वी अशा अनधिकृत शाळांवर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे.

**शिक्षणाधिकाऱ्यांवरही कारवाईच्या सूचना**

शिक्षण विभागाने जिल्ह्यातील अनधिकृत शाळांची यादी प्रसिद्ध करावी. त्या शाळेत प्रवेश घेवू नये म्हणून पालकांना सूचित करावे. ज्या शाळा अधिकृत नाहीत, त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करणे, दंड ठोठावण, शाळा बंद करण्याची कारवाई करण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. अनधिकृत शाळा व्यवस्थापनावर एक लाख रुपयाचा दंड ठोकल्या जाणार आहे. तरीही शाळा संचालित करणे बंद न केल्यास दर दिवशी दहा हजार रुपये दंड आकारण्याची दंडात्मक कारवाई होणार. शासनाकडून इरादा पत्र प्राप्त पण मान्यतापत्र नसलेल्या शाळांवरसुद्धा कारवाई केल्या जाणार आहे.

## पोटदुखी झालेल्यांसाठी बाळासाहेब ठाकरे दवाखाना सुरू : मुख्यमंत्री

✔ सुराज्य/मुंबई

ठाणे जिल्हा रुग्णालयाचा भूमिपूजन सोहळा शनिवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पार पडला. येथे मोठं सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभारलं जाणार आहे.

या भूमिपूजनाच्या कार्यक्रमावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाव न घेता माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह विरोधकांवर टीका केली आहे. शिंदे म्हणाले की, 'राज्यातल्या विकासकामांमुळे पोटदुखी झालेल्यांसाठी बाळासाहेब ठाकरे दवाखाना सुरू करण्यात आला आहे.'



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, 'राज्यात वेगाने विकासकामं होत आहेत. म्हणून काही लोकांना पोटदुखी होत आहे. त्यांच्या पोटदुखीवर उपचार करण्यासाठी आपण बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू करून ठेवला आहे. या दवाखान्यांमध्ये सर्व इलाज मोफत केले जातील.'

शिंदे म्हणाले की, 'आपण उभारत असलेल्या या नव्या रुग्णालयामुळे हजारो, लाखो लोकांना दिलासा मिळाला आहे. यासह आपलं सरकार आरोग्याच्या क्षेत्रात मोठं काम करत आहे. आपण रुग्णवाहिका वाटप करतोय, हिरकणी कक्ष सुरू केले आहेत. परंतु आपल्या या कामांमुळे अनेकांना पोटदुखी होत आहे. त्यांच्यावर बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे मोफत उपचार होतील. जनतेला सेवा पुरवणं हेच आपलं काम आहे.'

## उच्च शिक्षण संस्थांमध्ये आता 'कमवा आणि शिका' योजना

✔ सुराज्य/पुणे : **वंचित घटकातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणात समान संधी प्राप्त होण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) काही उपायांची शिफारस केली आहे. जोड अभ्यासक्रम, कमवा आणि शिका योजना, घटनात्मक अधिकारांच्या संरक्षणासाठी समान संधी कक्ष असे काही उपाय त्यात प्रस्तावित करण्यात आले आहेत.**

**यूजीसीची शिफारस**

उच्च शिक्षण संस्थांमध्ये योग्य वातावरण, वागणूक न मिळण्यासह शैक्षणिक ताणामुळे वंचित घटकांतील विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणातील गळती होत असल्याचे आतापर्यंत अनेक अभ्यासांतून दिसून आले. त्यामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग (नॉन क्रिमिलेअर), अल्पसंख्याक, आर्थिकदृष्ट्या मागास घटकांतील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण संस्थांमध्ये सर्वसमावेशक, समान आणि संवेदनशील वातावरण तयार होण्यासाठी यूजीसीने मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या. सर्वसाधारण विद्यार्थ्यांप्रमाणेच वंचित घटकांतील विद्यार्थ्यांनाही समान संधी मिळणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# बीडचे आमदार संदीप क्षीरसागर सापडले वादात

**▸ वडिलांसोबतचा वाद चव्हाट्यावर;**
**▸ घरातील सीसीटीव्ही व्हिडिओ व्हायरल**

✔ सुराज्य/बीड

**बीडचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संदीप क्षीरसागर हे सध्या वादात सापडले आहेत. कारण संदीप क्षीरसागर यांच्या कुटुंबातील वाद चव्हाट्यावर आला आहे. काही दिवसांपूर्वीच कौटुंबिक कारणावरून आमदार संदीप क्षीरसागर आणि त्यांचे भाऊ अर्जुन क्षीरसागर यांनी वडील रवींद्र क्षीरसागर यांना धक्काबुक्की केल्याचा आरोप झाला होता. या पार्श्वभूमीवर रवींद्र क्षीरसागर यांनी दोन्ही मुलांविरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. दरम्यान आता या घटनेचं सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे.**



आमदार संदीप क्षीरसागर यांच्या घरातील समोर आलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये वडील आणि दोन्ही मुलांमध्ये खडाजंगी उडत असल्याचं दिसत आहे. हे सीसीटीव्ही फुटेज सध्या जिल्हाभरात सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. मात्र क्षीरसागर कुटुंबात असा टोकाचा वाद नेमका कोणत्या कारणावरून झाला? याचं कारण अद्याप समजू शकलेलं नाही.

**वादाची जिल्ह्यात चर्चा**

बीड जिल्ह्यात क्षीरसागर कुटुंबाची चर्चा एकेकाळी केशरकाकूंच्या जबरदस्त राजकीय ताकदीमुळे, त्यानंतर त्यांचे चिरंजीव जयदत्त क्षीरसागर यांच्या राजकीय वर्चस्वामुळे होत असत. मात्र, हे कुटुंब सध्या आमदार संदीप क्षीरसागर विरुद्ध वडील राजेंद्र क्षीरसागर यांच्या वादामुळे चर्चेत आलं आणि पुन्हा एकदा क्षीरसागर कुटुंबातला वाद चव्हाट्यावर आला.

आधी काकांविरोधात निवडणूक लढवून आमदार झालेल्या संदीप क्षीरसागरांच्या वडिलांनी मुलानेच आपल्याला घराबाहेर काढल्याची तक्रार केली, घरातला वाद रस्त्यावर आला आणि अख्ख्या जिल्ह्यात दबदबा ठेवणाऱ्या क्षीरसागर कुटुंबात नेमकं चाललंय का याचीही चर्चा सुरू झाली आहे. या वादावर संदीप क्षीरसागर यांनी अद्याप आपली भूमिका मांडलेली नाही.

दरम्यान, जिल्ह्यात सध्या कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीचे बिगुल वाजलं आहे.

गेल्या ४० वर्षांपासून कृषी उत्पन्न बाजार समिती माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या ताब्यात होती. मात्र, आता याच जयदत्त क्षीरसागर यांचे पुतणे आमदार संदीप क्षीरसागर यावेळी मैदानात उतरल्याने या बाजार समितीची निवडणूक मोठ्या चुरशीची होणार असल्याचं चित्र आहे.

त्यातच संदीप क्षीरसागर यांच्या कौटुंबिक वादाचे सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झाल्याने जिल्ह्यातील राजकारण ढवळून निघालं आहे.

## कर्नाटकात राष्ट्रवादीचे नऊ उमेदवार रिंगणात, घड्याळ चिन्ह कायम

✔ सुराज्य/कर्नाटक


राष्ट्रीय पक्षाचा दर्जा गमाविलेला राष्ट्रवादी काँग्रेस कर्नाटक विधानसभेच्या नऊ जागा लढवीत आहे. सीमा भागात निपाणीमधून पक्षाचा उमेदवार रिंगणात असेल. राष्ट्रवादी काँग्रेसने अलीकडेच राष्ट्रीय पक्षाचा दर्जा गमाविला. हा दर्जा पुन्हा प्राप्त करण्याचे पक्षाचे प्रयत्न आहेत. या दृष्टीने कर्नाटकमध्ये नऊ उमेदवार रिंगणात आहेत.

सीमा भागात व शक्यतो बेळगावीमध्ये उमेदवार उभे करायचे नाहीत, असे पक्षाचे धोरण होते. पण निपाणी या सीमा भागातील मतदारसंघात उत्तम पाटील यांना पक्षाने उमेदवारी दिली आहे. पक्षाचा राष्ट्रीय दर्जा काढून घेण्यात आला असला तरी राष्ट्रवादीच्या विनंतीवरून निवडणूक आयोगाने कर्नाटकमध्ये घड्याळ' चिन्ह पक्षाला दिले आहे. पक्षाने १५ जणांची स्टार प्रचारकांची यादीही जाहीर केली. शरद पवार, प्रफुल्ल पटेल, सुप्रिया सुळे यांच्यासह राज्यातील क्राईड क्रॅस्ट्रो, शिवाजी गर्जे यांचा यादीत समावेश केला आहे. अजित पवारांसह राज्यातील अन्य कोणत्याही नेत्यांचा स्टार प्रचारकांचा यादीत समावेश केलेला नाही.




## सत्यपाल मलिक थेट पोहोचले पोलीस ठाण्यात

✔ **सुराज्य/जम्मू काश्मीर** : जम्मू आणि काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी त्यांच्या समर्थकांसह शनिवारी (२२ एप्रिल) दुपारी आर. के. पुरम पोलीस ठाणे गाठले. त्यामुळे त्यांना ताब्यात घेण्यात आल्याची चर्चा सोशल मीडियावरून रंगली. यानंतर दिल्ली पोलिसांनी सत्यपाल मलिकांवरून सुरु झालेल्या चर्चेवर ट्वीट करत माहिती दिली. दिल्ली पोलिसांच्या साऊथ वेस्टचे डीसीपी यांनी सांगितले की, 'सत्यपाल मलिक यांना ना ताब्यात घेतले आहे, ना अटक करण्यात आली आहे. ते स्वत: पोलीस ठाण्यात आले आहेत. आर. के. पुरम सेक्टर-९ मधील एका उद्यानात हे जमले होते. जेथे निदर्शनास परवानगी नाही. त्या लोकांना पोलीस ठाण्यात आणण्यात आले होते.



# भगवान परशुराम जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक

## चार हुतात्मा चौकात मूर्तीची प्रतिष्ठापना

## भाविकांनी घेतला दर्शनाचा लाभ

✔ सुराज्य/सोलापूर

**भगवान परशुराम जयंतीनिमित्ताने शनिवारी भगवान परशुराम जयंती महोत्सव समितीतर्फे भगवान परशुराम यांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. राजवाडे चौकातून सुरू झालेली ही मिरवणूक चार हुतात्मा चौकात समाप्त झाली. त्या ठिकाणी भगवान परशुरामाच्या साडेचार फूट मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर त्या ठिकाणी शेकडो भाविकांनी दर्शनाचा आणि प्रसादाचा लाभ घेतला. रात्री दहा वाजेपर्यंत भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.**





भगवान परशुराम जयंतीनिमित्त ब्राह्मण समाजातर्फे स्थापन करण्यात आलेल्या परशुराम जयंती महोत्सव समितीतर्फे शनिवारी भव्य मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक नव्या पेठेतील राजवाडे चौकातून दुपारी चार वाजता भगवान परशुराम यांच्या मूर्तीचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजन झाल्यानंतर निघाली. राजवाडे चौकातून निघालेली ही मिरवणूक नवी पेठ, मेकॅनिक चौक, सरस्वती चौक मार्गे जाऊन चार हुतात्मा पुतळा चौकात समाप्त झाली. या मिरवणुकीत घोडेस्वार, लेझीम पथक ढोल पथक, यांच्यासह समाजातील महिला -पुरुष, युवक - युवती आदींनी पारंपारिक वेष परिधान करून मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविला होता.

भगवान परशुराम जयंतीनिमित्त निघालेली ही मिरवणूक चार हुतात्मा चौकात आल्यानंतर त्या ठिकाणी ब्रह्मवृंदांच्या मंत्रघोषात भगवान परशुरामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. वेदमूर्ती गोविंद गवई, मुकुंदराव मुळेगावकर, ऋषिकेश दादेगावकर आदी ब्रह्मवृदांनी मंत्र पठण केले. त्यानंतर त्या ठिकाणी भाविकांची दर्शनासाठी आणि प्रसादासाठी मोठी गर्दी झाली होती.

यावेळी भगवान परशुराम जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष राजन कामत, निमंत्रक नितीन कुलकर्णी कार्याध्यक्ष अमर कुलकर्णी, सुधीर कुलकर्णी, मोहिनी पतकी, महिला प्रतिनिधी आश्लेषां नीपुणगे, प्रसिद्धी प्रमुख दत्ता आराध्ये, राम तडवळकर, पंचांगकर्ते मोहनराव दाते, भाजपाचे शहराध्यक्ष विक्रम देशमुख, नरेंद्र काळे, माजी महापौर शोभा बनशेट्टी, चंद्रकांत वानकर, विनोद भोसले, पांडुरंग दिड्डी, प्रशांत इंगळे, नाट्य परिषदेचे विजय साळुंखे, व्यंकटेश पटवारी, अभय दिवाणजी, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेचे सतीश पाटील, श्याम जोशी, हेमा चिंचोळकर, विजय कुलकर्णी, यांच्यासह जयतीर्थ पडगानूर, विक्रम ढोनसळे, गोपाल खंडेलवाल, प्रशांत बडवे, ॲड. यशश्री मराठे, मोहिनी पतकी, प्रशांत कुलकर्णी, मिनाताई चाटी, नीरज गोडबोले, ब्रह्म प्रतिष्ठानचे सुहास देशपांडे, यांच्यासह समाजबांधव, कार्यकर्ते उपस्थित होते.

### ब्राह्मण समाजातर्फे प्रथमच मिरवणूक

भगवान परशुराम जयंतीनिमित्त प्रथमच सोलापुरातून ब्राह्मण समाजातर्फे भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली होती. त्यामुळे मिरवणुकीत अभूतपूर्व असा उत्साह दिसून आला. मूर्ती स्थापनेनंतर सायंकाळी विविध समाजातील मान्यवरांनी हुतात्मा चौकात भेट देऊन दर्शन आणि प्रसादाचा लाभ घेतला.

### शहरात रमजान ईद उत्साहात साजरी

# देशात सर्व धर्मियांचा एकोपा निर्माण झाला पाहिजे : शहर काझी

✔ सुराज्य/सोलापूर

रमजान ईद निमित्त होटगी रोड ईदगाह मैदानावर शनिवारी सकाळी सार्वजनिक नमाज अदा करण्यात आली. जवळपास ५० हजार बांधवांनी यावेळी हजेरी लावली. पोलिसांच्या हस्ते गुलाब फुले देऊन या बांधवांचे स्वागत करण्यात आले.

होटगी रोड ईदगाह मैदानावर शनिवारी सकाळी ७.४५ वाजल्यापासून गर्दी होऊ लागली. शहर काझी मुफ्ती अमजदअली काझी यांच्या उपस्थित नमाज पठण झाले. यावेळी त्यांनी सर्वांना सुख, शांतीबरोबर देशात सर्व धर्मीयांचा एकोपा निर्माण झाला पाहिजे, असे आवाहन केले.



### जुनी मिल कंम्पाऊंड

रमजान ईदनिमित्त जुनी मिल कंम्पाऊंड येथील आदीलशहा ईदगाह मुस्लीम जमात हनाफिया ट्रस्ट येथे नमाज पठणा दरम्यान मुस्लीम बांधवांना संदेश देत होते. आदीलशहा ईदगाह येथे सकाळी ८.३० पासून मुस्लीम बांधव नमाज पठणासाठी येत होते. ९.१५ वाजता सर्व बांधव जमा झाले त्यानंतर ९.३० वाजता नमाज पठणाला सुरुवात झाली. १०.२० वाजता नमाज संपली. त्यानंतर मुस्लीम बांधवांनी एकमेकांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. सर्व धर्म व समाजाने एकमेकांसोबत प्रेमाने राहण्याची गरज आहे, असे झाल्यास देशाचा सर्वांगिण विकास होईल असा संदेश सय्यद फजुल्लाह खतीब सहाब यांनी दिला.

### चिमुकल्यांच्या ड्रेसकोडने वेधले लक्ष

यावेळी काही लहान मुले आणि तरुणांचे ड्रेसकोडमध्ये मैदानावर आगमन झाले. मोहमद मुस्तफा, मोहमद नवाज, मोहमद मोईद्दीन, मोहमद गुलामअली या चिमुकल्यांनी पांढरा जाकेट आणि शेरवानी परिधान करुन लक्ष वेधले.

### ईदगाहतर्फे उत्तम नियोजन

आदीलशहा ईदगाह येथे मुस्लिम बांधवांना बसण्यासाठी उत्तम नियोजन करण्यात आले होते. मुस्लिम बांधवांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली होती. नमाजसाठी लहान मुले पालक आणि नातेवाईकांसोबत आले होते. नमाजानंतर लहान मुलेही एकमेकांना शुभेच्छा देत होते. पोलिसांनी नवी वेस पोलिस चौकी व नरसिंग गिरजी मिलपासून वाहतुकीचा मार्ग बंद केला होता.



यावेळी काही ज्येष्ठ मंडळींनी उन्हापासून संरक्षणार्थ छत्री घेऊन हजेरी लावली. होटगी रोड ईदगाह मैदानावर जवळपास ३० हजार बांधव आणि मैदानांच्या बाजूला असलेल्या डांबरी रस्त्यावर, मुख्य रस्त्यांवर जवळपास २० हजार बांधव नमाज अदा केली. नमाज पठणासाठी जिल्हा सत्र न्यायाधीश शब्बीर औटी उपस्थित राहिले. प्रारंभी पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांनी या मैदानावर येऊन औटी आणि शहर काझी यांना भेटून रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर नमाज पठण झाले. यावेळी पोलिसांचा बंदोबस्तही होता. नमाज पठणानंतर उपस्थित बांधवांनी एकमेकांना हस्तांदोलन करीत शुभेच्छा दिल्या.

